१९ जून २०१८



असत वस्तूंनाच आपले स्वरूप मानणाऱ्या माणसाला आचार्य चोराची उपमा देतात. निषिद्धकर्म करणाऱ्या चोराला जसा सतत संकटाचा, दुःखाचा, अनिश्चिततेचा सामना करावा लागतो, तसाच देहाला सर्वस्व मानणाऱ्याचा दुःखे सतत पाठपुरावा करतात. अशाश्वत गोष्टींच्या मागे लागणाऱ्याला परखडपणे चोर म्हटले आहे.

यतिरसदनुसन्धिं बन्धहेतुं विहाय
स्वयमयमहमस्मि इति आत्मदृष्ट्यैव तिष्ठेत्।
सुखयति ननु निष्ठा ब्रह्मणि स्वानुभूत्या
हरति परमविद्याकार्यदुःखं प्रतीतम्॥३३७॥

यतीने असत् तत्त्वाचा ध्यास हे बंधाचे कारण सोडून देऊन स्वतः 'हा मी आहे' अशा आत्मबुद्धीने रहावे. स्वानुभूतीने निर्माण झालेली ब्रह्मतत्त्वावरील निष्ठा खरोखर सुखवते व अविद्येचे कार्य असलेले अनुभवाला येणारे दुःख नाहीसे करते.
शहाण्या, संयमी, विरक्त माणसाने असा असत तत्त्वाचा ध्यास घेतला तर तो जन्ममृत्युच्या चक्रात अडकतोच. हा असतच्या ध्यास हा बन्धहेतु आहे. या ध्यासापेक्षा ब्रह्मतत्त्वाठायी 'सोऽहम्' भाव वाढवणे आवश्यक आहे, असे आचार्य आग्रहाने प्रतिपादन करतात. हा 'सोऽहम्' भाव दृढ झाला आत्मतत्त्वाचा साक्षात्कार झाला की अज्ञानामुळे होणारे दुःख नाहीसे होते. एवढेच नाही तर ते जीवाला सुखवते — 'सुखयति ननु' असे सांगतात. त्याला आनंदघन स्थिती प्राप्त होते. सांख्य तत्त्वज्ञानात दुःखाची आत्यंतिक निवृत्ति म्हणजे आत्मज्ञानाची खूण मानली आहे. आत्मतत्त्वाची अपरोक्षानुभूति जीवनातील सर्व दुःखे व त्यांच्या पुसून टाकते.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

Notes

बाह्यानुसंधिः परिवर्धयेत् फलं
दुर्वासनामेव ततस्ततोऽधिकाम्।
ज्ञात्वा विवेकैः परिहृत्य बाह्यं
स्वात्मानुसंधिं विदधीत नित्यम्॥३३२॥

बाह्यविषयांचा ध्यास उरलेला तर दुर्वासना हेच फळ वाढवतो हे जाणून विवेकज्ञानाने बाह्य विषय नाहीसे करून नित्य स्वरूपानुसंधान ठेवावे.

बाह्ये निरुद्धे मनसः प्रसन्नता
मनःप्रसादे परमात्मदर्शनम्।
तस्मिन् सुदृष्टे भव बन्धनाशो
बहिर्निरोधः पदवी विमुक्तेः॥३३४॥

बाह्यविषय टाळले की मन प्रसन्न होते. मन प्रसन्न झाले की परमात्मदर्शन होते. त्या परमात्मतत्त्वाला पाहिले की भवबंध नष्ट होतो. बाह्य विषयांचा निरास हाच मुक्तीचा मार्ग आहे.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति॥
प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते।
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते॥

अनायास प्रसन्नता अनुभवता येते.

मन करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण। तुकाराम आणि ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

ज्याच्या पोटातच अमृताचा झरा उत्पन्न होतो त्याला तहानभुकेची काय तमा? अंतःकरण प्रसन्न झाले की कसले दुःख?

कः पण्डितः सन् सदसद्विवेकी
श्रुतिप्रमाणः परमार्थदर्शी।
जानन् हि कुर्यात् असतोऽवलम्बं
स्वपातहेतोः शिशुवत् मुमुक्षुः ॥३३६॥

सदसद्विवेकबुध्दी असलेला, श्रुती प्रमाण मानणारा, परमात्मतत्वाचा जाणकार, मुमुक्षु असणारा कोण बरे जाणूनबुजून एखाद्या शिशुप्रमाणे स्वतःला पडायला हवे या हेतूने असत् गोष्टींचा स्वीकार करेल? लहान मुले खेळताना आपणच आपल्याला धपकन पाडून घेतात व टाळ्या वाजवून हसतात. पण जो जाणकार, ज्ञानी आहे तो असा आपण होऊन विषयांच्या मागे लागणार नाही. बाह्य विषयांची हाव धरून अधःपतित होणार नाही.

देहादिसंसक्तिमतो न मुक्तिः
मुक्तस्य देहादि अभिमत्यभावः।
सुप्तस्य नो जागरणं न जाग्रतः
स्वप्नस्तयोर्भिन्नगुणाश्रयत्वात् ॥३३८॥

देह इ० मध्ये ज्याला आसक्ति आहे त्याला मुक्ति नाही. मुक्त झालेल्यांकडे देहादिविषयी आसक्ती असत नाही. झोपलेल्याला जाग नसते आणि जागा असलेल्याला स्वप्ने पडत नाहीत. कारण त्यांचे आश्रय भिन्न गुणधर्मांचे आहेत.
देहासक्त व मुक्त यामध्ये टोकाचा भेद आहे. त्यांचे आधार असणारे गुण भिन्न आहेत. आसक्त लोक केवळ मर्त्यदेहाचा आणि मुक्त विचार करतात केवळ परमात्मतत्वाचा।
या निशा सर्वभूतानां ---
दोन्ही स्थिती टोकाच्या

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


A fanatic is one who can't change his mind and won't change the subject.

अन्तर्बहिः स्वं स्थिरजङ्गमेषु
ज्ञानात्मनाधारतया विलोक्य
त्यक्ताखिलोपाधिः अखण्डरूपः
पूर्णात्मना यः स्थित एष मुक्तः॥३३९॥

सर्वात्मना बन्धविमुक्तिहेतुः
सर्वात्मभावान्न परोऽस्ति कश्चित्।
दृश्याग्रहे सत्युपपद्यते असौ
सर्वात्मभावोऽस्य सदात्मनिष्ठया॥३४०॥

चराचर सृष्टीत स्वतःला अंतर्बाह्य ज्ञानरूपाने आधारभूत मानून सर्व उपाधी त्यागून जो परिपूर्ण अशा आत्म्याशी एकरूप होऊन राहतो तो मुक्त होतो.

सदैव सर्वठायी आत्मरूप पहाण्याशिवाय बंधातून मुक्त होण्याचा दुसरा उपाय नाही. नित्य आत्मबुद्धीने दृश्याचा निरास झाला असता हा सर्वात्मभाव निर्माण होतो.

अहंभावाची उपाधी टाकून दिली तर दृश्यविश्वाचा विलय होतो आणि आत्मरूप झाल्यावर सर्वत्र आत्म्याचीच अनुभूती येऊ लागते.

दृश्यस्याग्रहणं कथं नु घटते देहात्मना तिष्ठतो
बाह्यार्थानुभवप्रसक्तमनसस्तत्क्रियां कुर्वतः।
संन्यस्ताखिलधर्मकर्मविषयैर्नित्यात्मनिष्ठापरैः
तत्त्वज्ञैः करणीयमात्मनि सदानन्देच्छुभिर्यत्नतः॥

देहावर आत्मबुद्धी ठेवून बाह्यविषयांच्या अनुभवात आसक्त असलेल्या मनाने त्या त्या क्रिया करणाऱ्याला विश्वाचा अनुभव न येणे कसे काय शक्य आहे? मात्र अशा तत्त्वज्ञान्यांनी प्रयत्नपूर्वक सर्व कर्मांचा, धर्मांचा, विषयांचा त्याग करून ब्रह्मावर होणारा दृश्यविश्वाचा आभास नाहीसा केला पाहिजे.



www.madhaveeraghuveer.com

# समाधि कल्पना - ३४२ ते ४१५



इथे आचार्य मुमुक्षुंना 'कर्मे करु नका किंवा धर्म पालन करु नका' असे सांगत नाहीत तर देह असेपर्यंत कर्मे करावीच लागतात. धर्म पाळावाच लागतो. मात्र हे सर्व करताना त्यातील आसक्ती टाळायची आहे. त्यात गुंतणे योग्य नाही. अशा रीतीने कर्माचा धर्माचा त्याग करावा.

सार्वात्म्यसिद्धये भिक्षोः कृतश्रवणकर्मणः।
समाधिं विदधात्येषा शान्तो दान्त इति श्रुतिः॥ ॥३४२॥

सर्वात्मभावाच्या सिद्धीसाठी श्रवणादी कर्मे केलेल्या यतीला शान्तोदान्त इ० श्रुती समाधीचा मार्ग सुचवते.

समाधि म्हणजे परमतत्त्वाठायी मन एकाग्र करणे असे त्याच्या ठायी मन एकाग्र झाले म्हणजे सर्वत्र त्याचेच अस्तित्व जाणवू लागते. जळी स्थळी काष्ठी ---

साधकाने अंतिम आध्यात्मिक उन्नतीसाठी षड् गुणांची दक्षतेने जोपासना केली पाहिजे.

१. शम - शांती, मनावर संयम
२. दम - आत्मसंयमन, इंद्रियदमन
3. उपरति - मनाची निवृत्ती
४. तितिक्षा - सर्व काही शांतपणे सहन करण्याची समर्थता
५. श्रद्धा - शास्त्रावर, स्वतःवर व सत्यस्वरूपावर विश्वास
६. समाधान - जे प्राप्त झाले आहे त्यावर समाधान.

या षड्गुणांनी संपन्न असल्यावर साधकाला आध्यात्मिक अनुभूति ही सोपी गोष्ट आहे.

आत्मनि एव आत्मानं पश्यति।

तस्मात् एवंविद् शान्तो दान्तो उपरतस्तितिक्षुः समाहितो भूत्वा आत्मनि एव आत्मानं पश्यति सर्वम् आत्मानं पश्यति।

आरूढशक्तेरहमो विनाशः
कर्तुं न शक्यः सहसापि पण्डितैः ।
ये निर्विकल्पाख्यसमाधिनिश्चलाः
तानन्तरानन्तभवा हि वासनाः ॥ ३४२ ॥

जे निर्विकल्प समाधित निश्चल असतात त्यांच्याशिवाय वृध्दिंगत झालेल्या अहंकाराचा नाश (अन्य) विद्वानांनाही सहजासहजी करणे शक्य नसते. कारण वासना या अनंत जन्मांच्या असतात.

अहंकार ही वासना मुळातच प्रबळ असते, त्यात ती अनंतजन्मांच्या संस्कारांनी दृढ होते तेव्हा तिला नष्ट करणे विद्वानांच्या देखील कक्षेत येत नाही. उलट विद्वानांकडे अहंकाराची मात्रा जास्त असते. मात्र ज्यांचे मन निर्विकल्प आहे, ज्यांच्या ठायी 'मी-तू' हा भेद उरला नाही, जे निर्द्वंद्व आहेत, शांत झाले आहेत अशांनाच अहंकाराचा समूळ नाश करणे शक्य आहे. आणि शांत होण्यासाठी जशी निवांत पोकळी योग्य तसा अहंकार विरघळण्यासाठी निर्विकल्प मनच योग्य आहे.

निर्विकल्प ही विचाररहित अवस्था आहे, जो सुखाने विचारांच्या अतीत झालेला असतो त्याचे सत्यस्वरूपाशी पूर्णपणे विलीनीकरण होते. जेव्हा तो चिंतनात मग्न होतो तेव्हा त्याचा अहं खोल खोल गाडला जातो. त्या शांत अवस्थेला निर्विकल्प म्हणतात.

अहंबुद्ध्यैव मोहिन्या योजयित्वाऽऽवृतेर्बलात् ।
विक्षेपशक्तिः पुरुषं विक्षेपयति तद्गुणैः ॥ ३४३ ॥

आवरण शक्ती, सत्यस्वरूप जाणून घेण्यास बुद्धिला

असमर्थ करत असते. म्हणून मन विक्षेपित होते. आणि ते संकल्प-विकल्प करू लागते. हा मन-बुद्धिचा चाळा सतत सुरू असतो. त्यामुळे व्यक्तीला अनेक प्रकारची दुःखे भोगावी लागतात. जगातील प्रत्येक जण आपापल्या परीने दुःखी असतो. प्रत्येक व्यक्तीच्या दुःखाचा प्रकार व व्याप्ती त्याच्या वासनेनुसार असते.

विक्षेपशक्तिविजयो विषमो विधातुं
निःशेषमावरणशक्तिनिवृत्त्यभावे ।
★ दृग्दृश्ययोः स्फुटपयोजलवद्विभागे
नश्येत्तदावरणमात्मनि च स्वभावात् ॥
निःसंशयेन भवति प्रतिबन्धशून्यो
विक्षेपणं न हि तदा यदि चेन्मृषार्थे ॥
॥३४५॥

आवरणशक्तीचा निःशेष निरास झाल्याशिवाय विक्षेपशक्तीवर विजय मिळवणे कठीण आहे. आणि ज्याप्रमाणे दूध पाण्यापासून त्याप्रमाणे दृश्य विश्व आणि द्रष्टा पूर्णपणे वेगळे झाले की आत्म्यावरील आवरण आपोआपच नष्ट होईल. जेव्हा असत् पदार्थांच्या बाबतीत मनात विक्षेप उत्पन्न होत नाही तेव्हा हा विजय निःसंशयपणे प्रतिबंध-रहित होतो.

इथे अहंकाराची सहाय्यक म्हणून विक्षेपशक्ती येते. अज्ञानाचेच मूर्त रूप म्हणजे अहंकार आहे. आणि अज्ञानाच्याच दोन शक्ती आहेत. आवृत्ती आणि विक्षेप. त्यामुळे त्या मदत करतात. त्यातील विक्षेपशक्ती प्रबळ आहे. ती अजेय व दुर्भेद्य आहे. परंतु जेव्हा द्रष्टा व दृश्य यातील भेद नाहीसा होईल तेव्हा या आवृत्तीचा नाश होईल. खरे तर दृश्यस्वरूप हा

www.madhavveeraghuveer.com

ब्रह्मस्वरूपावर होणारा भास आहे. ब्रह्म सत्य व जग मिथ्या आहे हे कळेल तेव्हा आत्मस्वरूप पूर्णपणे उकलेल. तेव्हा ही विक्षेपशक्ती निष्प्रभ ठरेल. त्यासाठी आत्मानात्मविवेक हवा. अशा व्यक्तीला संसारात येणे-जाणे नाही. तो पूर्णपणे मुक्त होतो कारण त्याच्यातील मायेचा, त्याच्या कल्पनांचा शेवट झालेला असतो.

सम्यग्विवेकः स्फुटबोधजन्यो
विभज्य दृग्दृश्यपदार्थतत्त्वम्।
छिनत्ति मायाकृतमोहबन्धं
यस्माद्विमुक्तस्य पुनर्न संसृतिः॥३७८॥
परावरैकत्वविवेकवह्नि:
दहत्यविद्यागहनं ह्यशेषम्।
किं स्यात्पुनः संसरणस्य बीजम्
अद्वैतभावं समुपेयुषोऽस्य॥३७९॥

प्रत्यक्ष ज्ञानातून निर्माण झालेला योग्य विवेक दृश्यविश्व व द्रष्टा यांच्या स्वरूपातील भेद दाखवून मायेने निर्माण केलेला अज्ञानरूपी बंध तोडून टाकतो. त्यायोगे मुक्त माणसाला पुन्हा जन्म-मृत्युचक्र प्राप्त होत नाही. ब्रह्म व जीव यांचे ऐक्यज्ञानरूपी अग्नि अविद्यारूपी गहन वन पूर्णतः जाळतो. ज्याला अद्वैतज्ञान झाले आहे, त्याच्या संसरणाचे बीज पुन्हा कसे बरे रुजेल?

स्फुटबोधजन्य या शब्दाने आचार्य ज्ञानातूनच विवेक जन्मतो हे सुचवतात. या विवेकामुळेच द्रष्टा व दृश्यविश्व यातील भेद कळतो. अज्ञानाचा बंध तुटून जातो. मनुष्य जेव्हा माझे घर, माझी माणसे म्हणत असतो तेव्हा त्यात अधिकाधिक गुंतत जातो.

www.madhaviraghuveer.com

परंतु जेव्हा वास्तवाची जाणीव होते तेव्हा खाडकन डोळे उघडतात. वाल्या कोळी सुद्धा विवेकाच्याच आधाराने महर्षि पदाला पोहोचला. मुमुक्षुने देखील असेच विवेकाने वागायला हवे. मायेने निर्माण केलेला बंध तोडण्यासाठी विवेकच हवा.

हा विवेकरूप अग्नि अज्ञानरूपी निबिड अरण्य समूळ नष्ट करतो आणि मग तिथे संसाराची बीज रुजणार नाही.

'बीज भाजून केली लाही' असे घडले की ते बीज पुन्हा अंकुरत नाही. त्याप्रमाणे जीव एकदा ब्रह्मरूप झाला की पुन्हा फेऱ्यात अडकत नाही.

राजाने गंमत म्हणून जरी भिकाऱ्याचा वेष घेतला तरी तो स्वतःची ओळख विसरत नाही. त्याचप्रमाणे महान पुरुष जगातील सुख दुःखांकडे क्रीडा म्हणून पाहतो. तो त्यात गुंतत नाही.

आवरणस्य निवृत्तिर्भवति च सम्यक्पदार्थदर्शनतः।
मिथ्याज्ञानविनाशस्तद्वद् विक्षेपजनितदुःखनिवृत्तिः॥३

सत्य पदार्थाच्या ज्ञानाने आवरणाचा नाश होतो. त्याप्रमाणे मिथ्या ज्ञानाचा विनाश होतो व विक्षेपामुळे निर्माण होणाऱ्या दुःखाची निवृत्ति होते.

एतत्त्रितयं दृष्टं सम्यक् रज्जुस्वरूपविज्ञानात्।
तस्माद् वस्तुसतत्वं ज्ञातव्यं बन्धमुक्तये विदुषा॥

या तिन्ही गोष्टी दोरीचे खरे स्वरूप कळल्यामुळे घडताना दिसतात. म्हणून विद्वानाने बंधमुक्त होण्यासाठी वस्तूचे स्वरूप जाणायला हवे.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


It is fortune, and not wisdom, that rules a man's life.

एकदा का सम्यक् ज्ञान म्हणजेच ब्रह्मज्ञान झाले की आवृतिनाश, मिथ्याज्ञानाचा नाश आणि विक्षेपजन्य दुःखाचा नाश असे त्रिविध नाश होतात. मल, आवरण, विक्षेप.

आचार्य इथे वस्तुच्या यथार्थ ज्ञानावर भर देतात. रज्जुचे स्वरूप समजले की सर्पाचा भास नाहीसा होतो, व सर्व अनर्थ टळतात.

अनात्मबंधनातून विद्वान माणूस मुक्त होतो.

अयोऽग्नियोगादिव सत्समन्वयात्
मात्रादिरूपेण विजृम्भते धीः।
तत्कार्यमेतत्त्रितयं यतो मृषा
दृष्टं भ्रमस्वप्नमनोरथेषु ॥३५०॥

ततो विकाराः प्रकृतेरहंमुखा
देहावसाना विषयाश्च सर्वे।
क्षणेऽन्यथाभाविन एष आत्मा
नोदेति नाप्येति कदापि नान्यथा ॥३५१॥

अग्नीशी संयोग झाल्यामुळे लोखंडापासून जसे स्फुलिंग बाहेर पडतात तशीच सत्स्वरूप आत्म्याच्या सान्निध्यामुळे बुद्धि ज्ञाता ज्ञेय, ज्ञान अशा त्रिविध-रूपांनी प्रत्ययाला येते, तिचे कार्य असलेले हे विश्व, भ्रम, स्वप्न व कल्पना या अवस्थांत मिथ्या असलेले दिसते.

त्यामुळे अहंकारापासून देहापर्यंतचे प्रकृतीचे सर्व विकार क्षणोक्षणी परिवर्तित होत असल्यामुळे मिथ्या आहेत. हा आत्मा तेवढा जन्मतही नाही आणि नष्टही होत नाही, आणि कधी बदलतही नाही.

लोखंड अग्निच्या संपर्कात आले की त्यातून स्फुलिंग बाहेर पडतात व ते दाहक बनते. तशीच बुद्धि आत्म्याच्या सान्निध्याने त्रिविध रूपात प्रकटते.



www.madhaveeraghuveer.com

६.६.२०१६



म्हणजेच बुद्धि ही उपाधी लागली की, ज्ञान ज्ञाता व ज्ञेय अशी त्रिपुटी निर्माण होते. मात्र तोपर्यंत आत्मा एकच असतो. नानारूपाने प्रतीत होणारी बुद्धि विश्वाचा पसारा मांडते पण तो मिथ्या असतो. कारण तो परिवर्तनशील असतो. विश्वातील कोणत्याही पदार्थाचे स्वरूप कायम राहत नाही सतत बदलत असते. ∴ आचार्य अन्यथाभाविन असा शब्द वापरतात. आत्मा मात्र बदलत नाही. तो जन्म मृत्यु परिवर्तन यांच्या पलीकडील असतो.

मग हा आत्मा नेमका असतो तरी कसा?

जेव्हा एखादा लोखंडाचा तुकडा आगीच्या संपर्कात येतो तेव्हा तो आगीचे तेज व उष्णता शोषून घेतो. अशा त्याच काळाने लोखंडाचा तुकडा आणि जळणारा कोळसा कोणता हे समजणार नाही. त्याचप्रमाणे अनात्म वस्तु जेव्हा आत्मतत्त्वाच्या - जाणीवतत्त्वाच्या संपर्कात येते तेव्हा त्याला जाणीवतत्त्वाचे सादृश्य प्राप्त होते. परंतु ती लोखंडी काही काळ आगीतून काढून दूर ठेवली तर त्याचे मूळ स्वरूप दिसू लागते.

लोखंड स्वभावतः जड ~~स्वभावाने~~ थंड स्पर्शाचे, रंगाने काळे असते. तर जळका कोळसा, वजनाने हलका, रंगाने सोनेरी लाल आणि स्पर्शाने जळजळीत असतो. दोघांचे गुणधर्म अगदी भिन्न असतात. परंतु आगीच्या सान्निध्यात असताना लोखंड आपले मूळ गुणधर्मापासून दूर होते व आगीचे गुणधर्म धारण करते. तसेच शरीर-मन-बुद्धि स्वतः जड आणि अचेतन असते. परंतु ती जेव्हा आत्मतत्त्वाच्या संपर्कात येते तेव्हा आत्मस्वरूपाचे वैभव त्याला प्राप्त होते व ते दिव्य दिसू लागतात.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


Injustice anywhere is a threat to justice everywhere.

नित्याद्वयाखण्डचिदेकरूपो बुध्यादिसाक्षी सदसद्विलक्षण: ।
अहंपदप्रत्ययलक्षितार्थ: प्रत्यक्सदानन्दघन: परात्मा ॥३५२॥

इत्थं विपश्चित सदसद्विभज्य
निश्चित्य तत्त्वं निजबोधदृष्ट्या ।
ज्ञात्वा स्वमात्मानमखण्डबोधं
तेभ्यो विमुक्त: स्वयमेव शाम्यति ॥३५३॥

अहं पदाने व प्रत्ययाने (मी या शब्दाने व अनुभवाने) जाणला जाणारा नित्य, आनंदघन, बुध्दी इ० चा साक्षी, सत् - असत् शोधीहून वेगळा, एकमेव, अखंड, चिन्मय असा सर्वांच्या आत सूक्ष्म परमात्मा आहे.

अशा प्रकारे सत् व असत् वेगळे करून आत्मज्ञानाने तत्व निश्चित करून अखंड ज्ञानरूप आत्म्याला जाणून त्या दृश्यविश्वातील विषयांमधून मुक्त होऊन आपोआप शांत होतो.

इथे आत्म्याचे स्वरूप सांगून, त्याला जो जाणतो, तो आपोआपच शांत होतो हे सुचवतात. 'स्वयमेव शाम्यति' हे शब्द महत्वाचे आहेत. खरे तत्व कळले की द्वैताचा भास नाहीसा होतो त्यामुळे निर्माण होणारे दुःख संपते. प्रक्षोभ नष्ट होतो मन स्थिर होते आणि आपोआपच शांति लाभते.

स शांतिमधिगच्छति — गीता - स्थितप्रज्ञ

अज्ञानहृदयग्रन्थेर्नि:शेषविलयस्तदा ।
समाधिनाविकल्पेन यदाद्वैतात्मदर्शनम् ॥३५४॥

निर्विकल्प समाधिच्या सहाय्याने अद्वैत आत्म्याचे ज्ञान जेव्हा होते तेव्हा अज्ञानरूपी हृदयग्रंथीचा निःशेष नाश होतो.

त्वमहमिदमितीयं कल्पना बुद्धिदोषात्
प्रभवति परमात्मन्यद्वये निर्विशेषे।
प्रविलसति समाधावस्य सर्वो विकल्पो
विलयनमुपगच्छेत् वस्तुतत्त्वावधृत्या ॥३५५॥

तू मी अशा कल्पना निर्विशेष अशा अद्वितीय परमात्म्याच्या ठायी निर्माण होतात ती बुद्धीच्या दोषांमुळेच! समाधी अवस्थेत वस्तुतत्त्वाच्या दृढ ज्ञानाने याचे हे सर्व विकल्प लयाला जातात.

आत्मतत्त्वाच्या सत्यस्वरूपाची अनुभूति येते तेव्हा हे सर्व मनप्रक्षोभ थांबतात. मनाची संतुलित अवस्था प्राप्त झाल्यावर विचारांचा प्रवाह थांबतो आणि ते आपोआप नाचणे थांबवतात. तेव्हा त्या अनंत तत्त्वाची अनुभूति येते.

शान्तो दान्तः परमुपरतः क्षान्तियुक्तः समाधिं
कुर्वन्नित्यं कलयति यतिः स्वस्य सर्वात्मभावम्।
तेनाविद्यातिमिरजनितान् साधु दग्ध्वा विकल्पान्
ब्रह्माकृत्या निवसति सुखं निष्क्रियो निर्विकल्पः॥
॥३५६॥

शांत, दांत, उपरत, क्षमाशील आणि नित्य एकाग्रचित्त यती आपल्या सर्वात्मकतेचे चिंतन करत असतो त्यामुळे अविद्यारूपी अंधारामुळे निर्माण होणाऱ्या विकल्पांना जाळून ब्रह्मरूप होऊन सुखाने निष्क्रिय, निर्विकल्प स्थितीत राहतो।

शांत - विषयवस्तूंच्या मागे न लागता मनावर संस्कार
दान्त इंद्रियदमन, विषयवस्तु बाह्य जगातून मनात न शिरणे
उपरत विषयोपभोगाच्या स्मृतिमध्ये मन धडका मारत नाही.
क्षान्ति तितिक्षा नसेल तर जीवनसदान टोचण्या सतावत राहतात
समाधि आत्मानुभूती पर्यंत स्वतःला उन्नत करण्यासाठी धडपडणे

www.madhaveeraghuveer.com

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


In every ordinary day there are a thousand miracles.

जेव्हा आपल्यामधील प्रत्यगात्मा हाच सर्वत्र असलेला आत्मा होय अशी प्रतीती येते तेव्हा अविद्येतून निर्माण होणारे सारे बंध जळून खाक होतात व तो महात्मा उन्मत होऊन सदा समाधानी राहतो.

अतीव सूक्ष्मं परमात्मतत्त्वं न स्थूलदृष्ट्या प्रतिपत्तुमर्हति ।
समाधिनात्यन्तसुसूक्ष्मवृत्त्या ज्ञातव्यमार्यैरतिशुद्धबुद्धिभिः ॥
।३६०॥

अत्यंत सूक्ष्म असे परमात्मतत्त्व जाणणे स्थूलदृष्टीने शक्य नाही. अतिशय सूक्ष्मवृत्तीने, एकाग्रमनाने, अत्यंत शुद्धबुद्धीने आर्यांनी ते जाणून घ्यायला हवे.

आत्मविचार हा सूक्ष्मतर आहे. तो बुद्धीच्या पलीकडे आहे. स्थूल ज्ञानोपकरणाने त्याचे ज्ञान होऊ शकत नाही. प्रगाढ ज्ञानसाधनेच्या स्तब्ध क्षणी विचार सूक्ष्म होत जातात. तेव्हाच मन उच्चतर, अतींद्रिय दिव्य अनुभूतीशी स्वरमेळ साधते. ज्यांनी आपली बुद्धी शुद्ध केली आहे अशा आर्यांना (मानवोत्तम) त्याचे ज्ञान होऊ शकते. या टप्प्यावर वासना कमी झालेल्या असतात. बुद्धी ब्रह्मज्ञानप्राप्तीसाठी सक्षम असते.

यथा सुवर्णं पुटपाकशोधितं
त्यक्त्वा मलं स्वात्मगुणं समृच्छति ।
तथा मनः सत्त्वरजस्तमोमलं
ध्यानेन संत्यज्य समेति तत्त्वम् ॥३६२॥

शुद्ध करण्यासाठी आगीत टाकलेले सोने जसे हीण टाकून स्वतःची झळाळी धारण करते त्याप्रमाणे मन ध्यानाने सत्त्व, रज, तम इ० गुणांचा मळ टाकून तत्त्व धारण करते. आपली मने त्रिगुणांच्या कीटाने अशुद्ध बनलेली असतात. ध्यानाग्नीच्या उष्णतेने हीण जळून जाते तेव्हा शुद्ध सत्त्व गुणयुक्त मन उरते तेव्हाच महान अनंततत्त्वाची अनुभूती येते.

योगस्य प्रथमं द्वारं वाङ्निरोधोऽपरिग्रहः।
निराशा च निरीहा च नित्यमेकान्तशीलता॥

वाणीचा निग्रह, संचय न करण्याची वृत्ती, अलिप्तता, निरीच्छा, नित्य एकांतवासाची आवड ही योगाची दारे आहेत.

एकान्तस्थितिरिन्द्रियोपरमणे हेतुर्दमश्चेतसः।
संरोधे करणं शमेन विलयं यायादहंवासना।
तेनानन्दरसानुभूतिरचला ब्राह्मी सदा योगिनः
तस्माच्चित्तनिरोध एव सततं कार्यः प्रयत्नान्मुनेः

एकांतात राहणे हे इंद्रियदमनाचे कारण, व इंद्रियसंयम हे मनाच्या निग्रहाचे कारण आहे. मनोनिग्रहाने अहंकारादि वासना नष्ट होते त्यामुळे योग्याला सदैव अचल अशा ब्रह्मानंदरसाचा अनुभव येतो. म्हणून मुनीने सतत मनोनिग्रह प्रयत्नपूर्वक करावा. इंद्रियदमन व मनोनिग्रह परस्परपोषक असतात. एकांतात विषयवस्तूंच्या सान्निध्यापासून ज्ञानेंद्रिये सावकाश निवृत्त होतात, त्यांच्या मागे धावण्याचे थांबतात. कारण आता मनाला अधिक समाधान देणाऱ्या आनंदावस्थेची प्राप्ती झालेली असते.

वाचं नियच्छात्मनि तं नियच्छ
बुद्धौ धियं यच्छ च बुद्धिसाक्षिणि।
तं चापि पूर्णात्मनि निर्विकल्पे
विलाप्य शान्तिं परमां भजस्व

वाणीचा लय मनात, मनाचा लय बुद्धीत, बुद्धीचा लय साक्षी अशा आत्म्यात आणि बुद्धीच्या साक्षी आत्म्याचा लय निर्विकल्प परमात्म्यात करून श्रेष्ठ अशा शांतीचा अनुभव घे.

यच्छेद्वाङ्मनसी प्राज्ञस्तद्यच्छेज्ज्ञान आत्मनि।
ज्ञानमात्मनि महति नियच्छेत्तद्यच्छेच्छान्त आत्मनि॥

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |

कठोपनिषद

८ जुलै २०१८

FRIDAY
OCT '16
14
288-078 WK-41

बुद्धीच्या अहंकारादि दोषांमुळे मी-तू, हे-ते असे सर्व भेद निर्माण होतात. मात्र जेव्हा निर्विकल्प समाधि अवस्था असते, तिथे हे सारे भेद नाहीसे होतात. कारण तिथे अद्वैत ब्रह्म हेच केवळ ध्यानाचा विषय असतो. मनाला ब्रह्माखेरीज दुसरा थारा नसतो.

निर्विकल्प समाधि ही अवस्था कशी व कुणाला?

शांत, शमदमादि गुणांनी युक्त अशा इंद्रियजयी मनुष्याला प्राप्त होते. तितिक्षा, क्षमा या दैवी गुणांनी तो युक्त असतो. उदासीन व अकाम असतो.

केवळ आणि केवळ ब्रह्म हेच त्याच्या चिंतनाचा विषय असतो. त्यामुळे सर्व वस्तूंच्या ठायी त्याला ब्रह्मत्व दिसत असते. अज्ञानाचा अंधकार सरून जातो.

कठोपनिषदात वर्णन केलेली अवस्था प्राप्त होते
भिद्यते हृदयग्रंथि: छिद्यन्ते सर्वसंशया:।

परमात्मतत्त्वाची प्राप्ति करणे स्थूलदेहाने शक्य नाही, कारण ते सूक्ष्म आहे. त्यामुळे ते निर्मळ मनाने व निर्दोष बुद्धीने जाणावे लागते.

समाधि अवस्था म्हणजे ब्रह्माठायी चित्त पूर्णपणे एकाग्र करण्याचा अभ्यास. समाधितच मन निर्दोष होऊन ब्रह्मतत्त्व जाणू शकते. ज्याप्रमाणे अग्नित टाकलेल्या सोन्यामधील हीण जळून जाते व ते सोनं खळखळीत आपले शुद्ध रूप धारण करते. तसेच मनातील सत्त्व, रज, तम हे त्रिगुण टाकून दिले जातात.

श्रवणाहून मनन श्रेष्ठ, मननाहून निदिध्यासन श्रेष्ठ परंतु समाधि अवस्था सर्वाहून श्रेष्ठ आहे.

मात्र ती एकदम जमू शकत नाही. त्यासाठी काही पूर्वतयारी हवी – वाणीसंयम, अपरिग्रह आणि अनपेक्ष ह्या तीन गुणांबरोबरच एकांतसेवन सांगितले आहे. ज्यास एकांत मानवला / आवडला ओघी कळे त्याला ॥

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

www.madhaveeraghuveer.com

एकांतात राहणे हा इंद्रियसंयमाचा उपाय आहे असे आचार्य म्हणतात. मात्र एकदा का इंद्रियसंयम व मनःसंयम एकांतात साधला की नंतर तो लोकात राहूनसुद्धा साधता येतो.

वाणीचा विलय मनात, मनाचा बुद्धित, बुद्धिचा तिचा साक्षी असणाऱ्या जीवात आणि जीवाचा परिपूर्ण आत्म्यात विलय करून शाश्वत शांती प्राप्त कर असे आचार्य शिष्याला सांगतात.

देहप्राणेन्द्रियमनोबुद्ध्यादिभिरुपाधिभिः।
यैर्यैर्वृत्तेः समायोगस्तत्तद्भावोऽस्य योगिनः ॥३७१॥

देह, प्राण, इंद्रिय, मन व बुद्धी इ. उपाधींपैकी ज्या ज्या उपाधिंशी योग्याच्या वृत्तीचा संयोग होतो तो तो भाव त्याला प्राप्त होतो.

तद् निवृत्त्या मुनेः सम्यक् सर्वोपरमणं सुखम्।
संदृश्यते सदानन्दरसानुभवविप्लवः ॥३७२॥

त्यांचा नाश झाल्यावर मुनी सर्व उपाधिंमधून अलिप्त होतो. त्याला पूर्ण उपरतीचा यथार्थ आनंद झालेला दिसतो. ज्यायोगे सदानंदरसाच्या अनुभवाचा पूर येऊ लागतो.

देह प्राण इंद्रिये यांच्या संपर्कात आल्यामुळे योग्याची चित्तवृत्ती त्या उपाधींशी तदाकार होते. परंतु त्या उपाधी नाहीशा झाल्या तर मात्र ती तदाकारता नष्ट होऊन बाह्यविषयातून मोकळी होते आणि परब्रह्माशी एकरूप होऊन आनंद अनुभवते. अगदी आनंदरसाच्या सागरात उचंबळत असल्याचा अनुभव



www.madhaveeraghuveer.com

त्सा बुद्धीला येतो. तेव्हा सोऽहंही अनुभूति येते. मग आनंदाचे डोही आनंद तरंग ही स्थिती येते. आनंदाशिवाय दुसरे काहीच उरत नाही. अशा आनंदाची उंची, खोली मोजता येत नाही. तो अवर्णनीय असा आनंद उपभोगतो.

अन्तस्त्यागो बहिस्त्यागो विरक्तस्यैव युज्यते।
त्यजत्यन्त बहिः सङ्गं विरक्तस्तु मुमुक्षया॥३६३॥

विरक्तालाच अंतर्बाह्य त्याग शोभतो. कारण मोक्षप्राप्तिच्या इच्छेने तो अंतर्बाह्य संगाचा त्याग करतो.

बहिस्तु विषयैः सङ्गस्तथान्तरहमादिभिः।
विरक्त एव शक्तोति त्यक्तुं ब्रह्मणि निष्ठितः॥
॥३६४॥

विषयांशी संग हा बाह्यसंग आणि अहंकार इ. शी संग हा अंतःसंग यांचा त्याग केवळ ब्रह्मस्वरूपात स्थित असलेला विरक्तच करू शकतो.
संग म्हणजे आसक्ती! बाह्यविषयातील आसक्ति म्हणजे बाह्यसंग आणि अहंकारादि विकारातील आसक्ती म्हणजे अंतः संग! या दोन्ही संगाचा त्याग घडायला हवा. पण हे सोपे नाही. केवळ ब्रह्मस्वरूपात ज्याचे चित्त स्थिर झाले आहे अशा विरक्तालाच हा त्याग शक्य आहे.

वैराग्यबोधौ पुरुषस्य पक्षिवत्
पक्षौ विजानीहि विचक्षण त्वम्।
विमुक्तिसौधाग्रतलाधिरोहणं
ताभ्यां विना नान्यतरेण सिद्ध्यति॥३६५॥

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

www.madhaveeraghuveer.com

१० जुलै २०१६

वैराग्य आणि ज्ञान हे पुरुषाच्या अंगी आवश्यक असणारे दोन गुण आहेत / दोन साधने आहेत. हे सांगताना आचार्य पक्ष्याच्या दोन पंखांची उपमा देतात. दोन्ही पंखांशिवाय जसा पक्षी आकाशात उंच झेप घेऊ शकत नाही, तसा मुमुक्षुही वैराग्य व ज्ञान या दोन साधनांशिवाय मुक्तिरूपी सौधावर आरोहण करू शकत नाही. केवळ ज्ञान ही पुरेसे नाही किंवा केवळ वैराग्यही नाही. या दोन्ही गोष्टी अनिवार्य आहेत.

ज्याला जाणिवतत्त्वाच्या उच्चतर पातळीवर उंच भरारी मारायची आहे अशा साधनमग्न मानवास वैराग्य व ज्ञान हे दोन पंख आवश्यक आहेत. एकाशिवाय दुसरे अपुरे आहे. आचार्य महान तत्त्वज्ञ तर आहेतच पण त्याशिवाय ते महान कवि आहेत. विषयाची स्पष्टता आणि स्वच्छता न गमावता अनेकदा ते काव्यवैपुल्य साधतात. या श्लोकात तेच आहे. तेजस्वी काव्याचा पेहराव चढवून वेदान्त कल्पनांचे स्फूर्तिगान करणारा हा सुंदर श्लोक आहे.

विवेक आणि वैराग्य उत्तम रीतीने जोपासता आले तरच अनंतत्वापर्यंतचे उड्डाण यशस्वी होऊ शकेल.

अत्यन्तवैराग्यवतः समाधिः
समाहितस्यैव दृढप्रबोधः।
प्रबुद्धतत्त्वस्य हि बन्धमुक्तिः
मुक्तात्मनो नित्यसुखानुभूतिः ॥३७६॥

आत्यंतिक वैराग्य असलेल्यालाच चित्त एकाग्र करणे साधते. एकाग्र चित्त असणाऱ्यालाच ज्ञान होते. तत्त्व जाणणारा बंधातून मुक्त होतो आणि मुक्त झालेल्याला नित्यसुखाचा अनुभव येतो.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


Every situation in life must be faced, and so why not face it with love.

वैराग्य हे समाधिचे मूळ, पर्यायाने मुक्तीचेही मूलस्थान आहे. ही एकातून एक साखळी आहे हा मुक्तीचा सोपान आहे. सोपान जरी आहे हा सोपा नाही. प्रत्येक पायरीवर धोके आहेत.

आणीक पहिलीच पायरी वैराग्याची आहे. मात्र हे वैराग्य तात्पुरते - स्मशानवैराग्य - नको. खरेखुरे कायम टिकणारे वैराग्य हवे. त्यासाठी अनंतवैराग्य हा शब्द वापरतात. तववरी वैराग्याच्या गोष्टी

जव कोणा ते दृष्टी पडली नाही ||

असे वैराग्य उपयोगी नाही. ज्यांनी पूर्ण वैराग्य अंगी बाणले असेल अशांनाच अतींद्रिय अनुभव येऊ शकतात. असे पुरुष केवळ आत्मतत्त्वातच रममाण होतात.

वैराग्यात् न परं सुखस्य जनकं पश्यामि वश्यात्मनः |
तद् चेत् शुद्धतरात्मबोधसहितं स्वाराज्यसाम्राज्यधुक् |
एतद् द्वारमजस्रमुक्तियुवतेः यस्मात् त्वम् अस्मात्परं
सर्वत्रास्पृहया सदात्मनि सदा प्रज्ञां कुरु श्रेयसे ||376||

आत्मसंयमी माणसाच्या सुखाचा वैराग्याशिवाय दुसरा जनक मला दिसत नाही. ते वैराग्य जर शुद्धतर आत्मज्ञानासह असेल तर ते सार्वभौम साम्राज्य देणारे ठरते. हे अविनाशी अशा मुक्ति युवतीकडे जाण्याचे द्वार आहे. म्हणून तू सर्वत्र निस्पृह होऊन स्वतःच्या कल्याणासाठी सदैव विचार कर. ब्रह्माठायी वृत्ती स्थिर कर.

आत्मसंयमी माणसाच्या सुखाचा जनक म्हणजे वैराग्य आहे. हे सुख अर्थातच भौतिक नाही तर मोक्षसुख आहे. आणि या वैराग्याला जर आत्मज्ञानाची जोड दिली तर ते स्वाराज्य साम्राज्ययुक्त असणार आहे. मुक्तीला चिंता वा दुःख नसणारी युवती म्हटले आहे.

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

WEDNESDAY

OCT '16

19

293-073 WK-42

श्रेयस म्हणजे पारमार्थिक कल्याण! किंवा शाश्वत / चिरंतन हित आहे. अशा या शाश्वत हितासाठी तू हे मन केवळ परमात्म्याठायी ठेव. खरोखर वैराग्याने जीवन जगणारा कधी निराशेने ग्रस्त नसतो. तर त्याच्यामध्ये एक प्रकारची आत्मतृप्ती, आंतरिक श्रीमंती जाणवत असते. सदैव आनंदाची भावना असते. अशा आनंदाशी तुलना करताना बाह्य वस्तुजगत क्षुल्लक, तुच्छ, घाणेरडे किंवा शून्यवत वाटते. अशा विरागी माणसाला जर आत्मसुखाचा आनंदाचा शोध लागला असेल, तर त्याचे सुख अतिमहान होते. त्यानंतर तो अंतर-जगतातील विचारांवर किंवा अवलंबून रहात नाही — स्वराज्य! तसेच बाह्य जगतातील परिस्थितीवरही नाही. अशा रीतीने तो आपल्यातील विचारांवर राजेशाही आणि बाह्य वस्तुजगतावर सम्राटपद मिळवतो.

मुक्ती हे अंतिम कल्याण आहे. मोक्षरूपी मुक्ती-पर्यंत पोहोचण्याचे वैराग्य हे दार आहे. म्हणून त्यासाठी आत्मतत्त्वावर सतत चिंतन करा. मग कुठले दुःख? कुठला अपवित्रपणा? केवळ आनंदच आनंद!

आशां छिन्धि विषोपमेषु विषयेष्वेषैव मृत्योः सृतिः
त्यक्त्वा जातिकुलाश्रमेष्वभिमतिं मुञ्चातिदूरात्क्रियाः।
देहादावसति त्यजात्मधिषणां प्रज्ञां कुरुष्वात्मनि
त्वं द्रष्टास्यमलोऽसि निर्द्वयपरं ब्रह्मासि यद्वस्तुतः॥

विषासारख्या विषयांतील आशा नष्ट कर. कारण हाच मृत्यूचा मार्ग आहे. जाती, कुल, आश्रम यातील आसक्ती सोड. आणि दुरूनच कर्मांचा त्याग कर. देहादि असत विषयांवरील आसक्ती सोडून दे. बुद्धी आत्म्याठायी स्थिर कर. कारण तू द्रष्टा आहेस. निर्मळ आहेस.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |



Courage is resistance to fear, mastery of fear - not absence of fear.

अव्यय अहेस आणि खरोखरीच ब्रह्म आहेस.
हा उपदेश म्हणजे गुरुशिष्यातील संवाद आहे. शिष्याला त्याच्या खऱ्या रूपाची आठवण करून देत आहेत. त्यासाठी वासना, आसक्ति आणि कर्मे यांचा त्याग घडायला हवा. विषय हे विषासारखेच आहेत. त्यांच्या प्राप्तीची इच्छा धरणे म्हणजे मृत्युच्या मार्गाने जाण्यासारखे आहे. असे सांगून सावध करतात. थोडक्यात मुमुक्षु शिष्याचे उन्नयन करून त्याला मोक्षमार्गासाठी प्रवृत्त करतात.
मृत्यु म्हणजे परिवर्तन आहे. जात, कुल, आश्रम यांच्या अभिमानामुळे दृष्टी दोषयुक्त होते, त्यामुळे वस्तु विकृत दिसू लागतात. सुंदर असणारे जग विद्रूप दिसू लागते. कामनाप्रेरित सर्व कर्मे सोडून द्या, अनात्म सोडून देऊन आत्मतत्त्वाशी तदाकार व्हा. 'मी ब्रह्म आहे' यावर श्रद्धा ठेवा. त्याचे चिंतन करून बुद्धि शांत, स्थिर करा. तुम्ही केवळ तो अनंत नारायण आहात. तत् त्वम् असि।

लक्ष्ये ब्रह्मणि मानसं दृढतरं संस्थाप्य बाह्येन्द्रियम् ।
स्वस्थाने विनिवेश्य निश्चलतनुश्चोपेक्ष्य देहस्थितिम् ।
ब्रह्मात्मैक्यमुपेत्य तन्मयतया चाखण्डवृत्त्याऽनिशं
ब्रह्मानन्दरसं पिबात्मनि मुदा शून्यैः किमन्यैर्भ्रमैः ॥

ब्रह्मरूपी लक्ष्यावर मन दृढतापूर्वक स्थिर करून, बाह्येंद्रियांना स्वस्थानी ठेवून, शरीराला स्थिर ठेवून देहावस्थेची उपेक्षा करून, ब्रह्मात्मैक्य प्राप्त करून, तन्मयवृत्तीने आणि एकरसतेने, सदैव आनंदाने मनातल्या मनात ब्रह्मानंदरस प्राशन कर. अन्य व्यर्थ भ्रमांचा काय उपयोग?
देहादिकांवरील ममत्व समजा काढून टाकता आले तरी दुसरे काही तरी लक्ष्य हवे ना! त्यासाठी आचार्य

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

ब्रह्मावर चित्त एकाग्र करायला सांगत आहेत. इतर व्यर्थ भ्रमात अडकू नये.

कार, बैक T.V पाहिजे नको असे मुलांना बजावताना पर्यायही द्यायला हवा. निश्चित रूपरेषा असावी. नाहीतर घातक अशा इतर गोष्टींकडे वळण्याची शक्यता आहे.

एक निश्चित आसन स्थिर करून त्या Posture मध्ये शांतपणे बसून आत्म्याचे चिंतन करता आले पाहिजे. त्याच्या आंतरबाह्य वैभवाच्या एकतेची प्रचीती घ्या व 'मीच ब्रह्म आहे' ही वृत्ती सातत्याने ठेवा.

असत वस्तु दीर्घकाळ सुख देऊ शकत नाहीत. तेव्हा सत् शी एकरूप होण्याचा प्रयत्न करा.

अनात्मचिन्तनं त्यक्त्वा कश्मलं दुःखकारणम्।
चिन्तयात्मानमानन्दरूपं यन्मुक्तिकारणम्॥३८०॥

दुःखाचे कारण अशा भ्रमरूप अनात्मचिंतनाचा त्याग करून मुक्तीचे कारण असणाऱ्या आनंदरूप आत्म्याचे चिंतन करा. अनात्मवस्तूंचे चिंतन हे वेदना व दुःख यांनी युक्त आहे. त्याची चिंता सोडून द्या. त्यातून केवळ गुलामगिरीचा अनुभव येतो. तुम्ही गुलाम नाही तर स्वानंद साम्राज्याचे स्वामी आहात.



www.madhaveeraghuveer.com

१२ जुलै २०१८

SATURDAY
OCT '16
22
296-070 WK-42

मागील चार श्लोकात आचार्य सांगतात की अनात्म विश्व हे दुःख देणारे आहे, पापरूप आहे याउलट आत्मस्वरूप नित्य आनंद देणारे आहे. मुक्ती प्राप्त करून देणारे आहे. प्रकाशरूप आत्मा बुद्धीच्या ठिकाणी प्रकाशमान होत असतो.
विज्ञानकोशे विलसति।

चिंतनाची वस्तू जर 'आत्मा' करायची असेल तर त्यासाठी बुद्धी इतर प्रत्ययांनी व्यापलेली नसावी. दृश्यविश्वाविषयीची जाणीव नष्ट होऊन वृत्ती आत्म्याशी तदाकार व्हायला हवी. तरच देहादिकांवरील अहंबुद्धी सुटेल. जीवाने असे तदाकार होऊन देहाच्या उपाधिविषयी घटपटाप्रमाणे उदासीन रहावे असे आचार्य सांगतात.

घरातील एखादा घट फुटला किंवा वस्त्र फाटले म्हणून त्याविषयी दुःख करत न बसता आपण नवीन घेतो. तशीच देहाविषयी आसक्ती नसावी. ☆

[illegible]च आपल्याच घरात पाहुण्यासारखे रहावे.
(पाहुणा) 'हे आपले घर नाही' हे समजून असतो त्या घरातील घडणाऱ्या घटना तो फार मनाला लावून घेत नाही. अस्वस्थ होत नाही. अलिप्तपणे तो या साऱ्या गोष्टींकडे पहातो. त्याचप्रमाणे मी या देहाहून वेगळा आहे चिद्घन नित्य आत्मा आहे ही जाणीव सतत असावी.

विशुद्धमन्तःकरणं स्वरूपे
निवेश्य साक्षिण्यवबोधमात्रे।
शनैः शनैर्निश्चलतामुपानयन्
पूर्णत्वमेवानुविलोकयेत् ततः ॥३८॥

नंतर केवळ ज्ञानरूप, साक्षी अशा स्वरूपाठायी विशुद्ध अंतःकरण ठेवून हळूहळू निश्चलता प्राप्त करावी. आणि आपल्या पूर्णत्वाचेच ज्ञान प्राप्त करून घ्यावे.

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

केवळ देहाविषयी उदासीन / अलिप्त (न्यूट्रल) राहणे हे अंतिम गंतव्य नाही तर ती एक मधली पायरी आहे. ब्रह्माशी मन एकाकार करणे ही पूर्णावस्था आहे आणि ती मुमुक्षुने प्राप्त करून घ्यायला हवी.

सूर्य हा वस्तु-जगताचा साक्षी असतो. परंतु त्या वस्तु मात्र सूर्यात नसतात. सूर्य केवळ प्रकाश असतो, तसेच आत्मतत्त्व हे केवळ जाणीवतत्त्व (बोधमात्र) असते. सर्व विक्षेपांपासून सुटलेले असे मन त्या जाणीवतत्त्वात दृढ करायचे आहे. इतर विक्षेपांना सावकाश शांत स्थितीत आणून आत्मचिंतनात दृढ करायचे आहे.

देहेन्द्रियप्राणमनोऽहमादिभिः
स्वाज्ञानक्लृप्तैः अखिलैः उपाधिभिः।
विमुक्तमात्मानमखण्डरूपं
पूर्णं महाकाशमिव अवलो[illegible]त्॥३८५॥

स्वतःच्या अज्ञानामुळे निर्माण झालेल्या देह, इंद्रिये, प्राण, मन, अहंकार इ० सर्व उपाधितून मुक्त झालेल्या अखंड, परिपूर्ण आत्म्याला महाकाशाप्रमाणे पहावे.

खरे तर आत्मतत्त्व हे काही अवकाश नव्हे, परंतु बौद्धिक आकलनासाठी त्याची तुलना सर्वात सूक्ष्म अशा भूताशी - महदाकाशाशी - केली आहे.

घटकलशकुसूलसूचिमुख्यैर्गगनमुपाधिशतैर्विमुक्तमेकम्।
भवति न विविधं तथैव शुद्धं परमहमादिविमुक्तमेकमेव॥

घट, कलश, कोठार, सुईचे नेढे इ० शेकडो उपाधींनी रहित आकाश एकच असते. ते विविध प्रकारचे होत नाही. त्याचप्रमाणे अहं इ० उपाधींनी रहित परब्रह्म एकमेव असते.



www.madhaveeraghuveer.com

एखाद्या दालनात रिकामा घट आणला तर त्यात आकाश असतेच. तो तिथून परत नेला तर किंवा तो घट तिथेच फुटला तरी महदाकाशात काहीच बदल होत नाही. वाढ किंवा घट होत नाही. तसेच आत्म्याशी देह, इंद्रिये, प्राण, मन या उपाधींनी लिप्त होत नाही. तो सर्वत्र चैतन्यरूप असतो. महदाकाशाप्रमाणेच तो निरुपाधिक असतो.

ब्रह्मादिस्तम्बपर्यन्ता मृषामात्रा उपाधयः।
ततः पूर्णं स्वमात्मानं पश्येदेकात्मना स्थितम्॥३८७॥

ब्रह्मदेवापासून स्तंबापर्यंत साऱ्या उपाधी केवळ मिथ्या आहेत. तेव्हा आपल्याच परिपूर्ण आत्मस्वरूपाला अद्वैतभावाने पहावे. स्थूलापासून सूक्ष्मापर्यंत म्हणजे अगदी ब्रह्मदेवापासून ते गवताच्या काडीपर्यंत या सर्वांना आचार्य उपाधी-मिथ्या म्हणतात.

यत्र भ्रान्त्या कल्पितं यद्विवेके
तत तत्मात्रं नैव तस्मात् अभिन्नम्।
भ्रान्तेः नाशे भ्रान्तिदृष्टाहितत्त्वं
रज्जुस्तद् विश्वमात्मस्वरूपम्॥३८८॥

दोरीवर सापाचा भास होतो तो खरे स्वरूप न कळल्यामुळे! मात्र जेव्हा ते कळते तेव्हा तिथे दोरीच दिसते. मग तेव्हा तो साप कुठे जातो? ब्रह्मावर विश्वाचा भास होतो. (कधी) ब्रह्माचे खरे स्वरूप समजले की भासमान असणारे विश्व कुठे जाते? तर ते त्यातच विलीन होते. प्रत्यक्ष वस्तू व भासमान वस्तू एकरूप होते. भासमान वस्तु स्वतंत्रपणे उरत नाही.



www.madhaveeraghuveer.com

जेव्हा भ्रांतमय विपरीत भावना संपतात तेव्हा अधिष्ठान स्पष्टपणे दिसू लागते. जेव्हा भूत दिसते तेव्हा स्थाणु दिसत नाही, परंतु जेव्हा विवेकबुद्धि जागृत होते तेव्हा भ्रांती संपुष्टात येते आणि मग भूत दिसत नाही. केवळ अधिष्ठानरूप स्थाणुच दिसतो.

स्वयं ब्रह्मा स्वयं विष्णुः स्वयमिन्द्रः स्वयं शिवः।
स्वयं विश्वमिदं सर्वं स्वस्मात् अन्यत् न किञ्चन ॥३८९॥

स्वतः आत्माच ब्रह्मदेव, आत्माच विष्णु, तोच इंद्र, तोच शिव आणि तोच हे सर्व विश्व आहे. आत्म्याहून भिन्न काहीही नाही.
आत्म्याचे ज्ञान झाले की विश्व आत्मरूपात विलीन होते आणि आपोआपच सर्वत्र केवळ आत्म्याची अनुभूति येऊ लागते. ब्रह्मा, विष्णु, शिव, इंद्र इतकेच काय हे सर्व विश्वदेखील आत्मरूपच आहे हे जाणवते.

याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवाद — बृहदारण्यक
इदं ब्रह्म इदं क्षत्रमिमे लोका इमे देवा इमे वेदा
इमानि सर्वं भूतानि इदं सर्वं यदयं आत्मा।

अन्तः स्वयं चापि बहिः स्वयं च
स्वयं पुरस्तात् स्वयमेव पश्चात्।
स्वयं ह्यवाच्यां स्वयमप्युदीच्यां
तथोपरिष्टात्स्वयमप्यधस्तात् ॥३९०॥

आत्माच आत आहे आणि बाहेरही आहे. आत्माच पुढे आणि मागे आहे. पूर्व, पश्चिम, दक्षिण उत्तर तसेच वर व खाली आत्माच आहे.
सर्व भूतमात्रात आत्मस्वरूप दिसू लागते. त्याच्या



www.madhaveeraghuveer.com

२७ जुलै २०१७



पुढची ही अवस्था आहे.
अंदर राम बाहर राम
जहाँ देखू तहाँ राम ही राम।
जागत राम सोवत राम
सपनेमें देखूँ आत्माराम॥ — एकनाथ
तर समर्थ म्हणतात.
रिता ठाव या राघवेवीण नाही।
विश्वरूप दर्शन झाले तेव्हा अर्जुनानेही हा अनुभव घेतला.
नमः पुरस्तात ----- पाठ फिरवली तरी त्याचे दर्शन। अगदी डोळे मिटून घेतले तरी समोर तोच दिसतो.

तरङ्गफेनभ्रमबुद्बुदादि सर्वं स्वरूपेण जलं यथा तथा।
चिदेव देहाद्यहमन्तमेतत् सर्वं चिदेवैकरसं विशुद्धम्॥३७॥

त्याप्रमाणे तरंग, फेस, भोवरा, बुडबुडा इ० सर्व स्वरूपतः पाणीच आहे. त्याचप्रमाणे देहादीपासून अहंकारापर्यंत हे सर्व चिद्रूपच आहे. विशुद्ध एकरस चैतन्यच आहे.
सर्वं खल्विदं ब्रह्म। हे तत्त्व आचार्य पाण्याचा दृष्टांत देऊन स्पष्ट करतात. पाणी जेव्हा शांत, संथ असते तेव्हा त्यात तरंग नसतात, फेस-बुडबुडे नसतात. परंतु जलतत्त्व तेच असते. खडा टाकल्यावर पाणी हलते, डहुळते त्यात तरंग निर्माण होतात. कधी हवेमुळे बुडबुडे फेस दिसतो. परंतु हे सर्व पाण्याचेच आविष्कार आहेत.
त्याचप्रमाणे आत्म्यावर भासणारे दृश्यविश्वातील सारे पदार्थ हे तरंग, बुडबुड्यांप्रमाणे क्षणिक आहेत. वस्तुतः ते सर्व आत्म्याचेच आविष्कार आहेत. मुळात आत्म्याहून वेगळे अस्तित्व त्यांना नाही.

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



www.madhavearaghuveer.com

सदेवेदं सर्वं जगदवगतं वाङ्मनसयोः
सतोऽन्यन्नास्त्येव प्रकृतिपरसीम्नि स्थितवतः।
पृथक्किं मृत्स्नायाः कलशघटकुम्भाद्यवगतं
वदत्येष भ्रान्तस्त्वमहमिति मायामदिरया॥
॥३९२॥

वाणी आणि मन यांना कळणारे हे सर्व विश्व ब्रह्मच आहे. मायेपलीकडे असणाऱ्या सत तत्त्वाहून ते वगळे नाही. कलश, घट, कुंभ या नावांनी जे ओळखले जातात ते मातीपेक्षा वेगळे असतात का? तरीसुद्धा हा जीव मायारूपी मदिरेने भ्रमिष्ट होऊन "तू" "मी" असे बोलत असतो.

मदिरा जशी माणसाला बेभान करते, त्याला नाना भास होतात, त्या धुंदीत तो काय बोलतो हे कळत नाही. तसेच मायेने वेढल्यामुळे जीव तू-मी च्या भेदात अडकतो. वाटेल ते बोलतो व दुःखी होतो.

वासनांच्या मोहग्रस्त आभासामुळे आपल्याला वैविध्य दिसते. आपल्याला त्या नारायणाची अनुभूती येत नाही.

क्रियासमभिहारेण यत्र नान्यदिति श्रुतिः।
ब्रवीति द्वैतराहित्यं मिथ्याध्यासनिवृत्तये॥३९३॥

यत्र नान्यत् पश्यति नान्यत् शृणोति, नान्यत् विजानाति स भूमा। जिथे दुसरा कुणी पहाणारा, ऐकणारा वा जाणणारा नसतो तिथे द्वैत नाहीच. केवळ अद्वैतच आहे.

जिथे द्वैत असेल तिथेच कुणीतरी कुणालातरी पाहील, वास घेईल, ऐकेल, बोलेल, जाणेल. पण जो स्वतः सर्व जाणतो त्या ज्ञात्याला कोण जाणणार?

क्रियापदांच्या वारंवार वापराने मिथ्या अध्यासाच्या निवृत्तीसाठी श्रुतिवचने द्वैताला नाकारतात. सनत्कुमार व नारद संवाद | छांदोग्य | बृहदारण्यक

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


If I enjoy praise, it means I can easily hurt by defamation.

www.madhaveeragni.com

आकाशवत् निर्मल निर्विकल्प-
निःसीमनिःस्पन्दननिर्विकारम् ।
अन्तर्बहिः शून्यमनन्यमद्वयं
स्वयं परं ब्रह्म किमस्ति बोध्यम् ॥३८४॥

आकाशाप्रमाणे निर्मळ, निर्विकल्प, निःसीम, निःस्पन्द, निर्विकार अन्तर्बाह्यातीत, अद्वितीय असे ब्रह्म आपणच असल्यावर जाणायचे वेगळे काही उरेल का?

जन्म, वृद्धि, नाश आणि मृत्यु ही परिवर्तनेसुद्धा केवळ काळाच्या क्षेत्रात आणि सीमित वस्तुमात्रात घडू शकतात. अनंततत्त्वात परिवर्तन कदापि शक्य नाही. आत-बाहेर या कल्पना देहाच्या संदर्भात असतात. मात्र इंद्रियातीत असल्यावर केवळ सत्यस्वरूपाचीच अनुभूती येते.

वक्तव्यं किमु विद्यतेऽत्र बहुधा ब्रह्मैव जीवः स्वयं
ब्रह्मैतज्जगदाततं नु सकलं ब्रह्माद्वितीयं श्रुतिः ।
ब्रह्मैवाहमिति प्रबुद्धमतयः सन्त्यक्तबाह्याः स्फुटं
ब्रह्मीभूय वसन्ति सन्ततचिदानन्दात्मनैतद् ध्रुवम् ॥३८५॥

इथे बोलण्यासारखे काय आहे बरे? जीव हा स्वतःच ब्रह्मरूप आहे. परमाणूपासून ब्रह्मदेवापर्यंत विस्तारलेले हे सर्व विश्व ब्रह्मच आहे. ब्रह्म अद्वितीय आहे असे श्रुतीच म्हणते. 'मी ब्रह्मच आहे' अशी ज्यांची धारणा आहे असे लोक बाह्यविषय त्यागून ब्रह्मरूप होऊन निःसंशयपणे सदैव चिदानंदरूपाने राहतात.

ब्रह्माला पुन्हा पुन्हा आचार्य आकाशाची उपमा देतात. परंतु ब्रह्म म्हणजे आकाश नव्हे. कारण आकाश हे सूक्ष्म असले तरी ते पंचमहाभूतांपैकी आहे. त्यामुळे तो प्रकृतीचा एक विकार आहे. (ते जड आहे-सापेक्ष) परंतु ब्रह्म हे कुणाचे कार्य नाही. ते केवळ चैतन्यरूप आहे.

जाहि मलमयकोशेऽहंधियोत्थापिताशां
प्रसभमनिलकल्पे लिङ्गदेहेऽपि पश्चात्।
निगमगदितकीर्ति नित्यमानन्दमूर्ति
स्वयमिति परिचीय ब्रह्मरूपेण तिष्ठ॥३८४॥

प्रथम मलयुक्त स्थूल देहावर अहंकारामुळे निर्माण झालेली आसक्ती टाकून दे. नंतर वाऱ्यासारख्या चंचल अशा लिंगदेहावरची आसक्ती सुध्दा सोड. वेदांनी ज्याची कीर्ति गायली आहे असा नित्य आनंदस्वरूप आत्माच आपण आहोत हे जाणून तू ब्रह्मरूपाने रहा.

स्थूल देह तर निंद्य, घाणेरडा आहे. परंतु सूक्ष्मदेहही वाऱ्यासारखा चंचल व क्षणभंगुर आहे. वाऱ्याप्रमाणेच सूक्ष्म देह दिसत नाही परंतु त्याचे कार्य सुरु असते. या दोन्ही देहांच्या आसक्तीतून दूर होऊन केवळ आत्मस्वरूपावरच स्थिर हो. देहतादात्म्य जोपर्यंत आहे तोपर्यंत दुःख, संघर्ष आहेत. जन्म, जरा, व्याधि, क्षय, मृत्यु हे दुःखपूर्ण टप्पे आहेत. जेव्हा सत्यतत्वाची अनुभूति येते तेव्हा तुम्ही स्वतः मांगल्याचे मूर्तिमंत प्रतीक होत असता.

शवाकारं यावद् भजति मनुजस्तावदशुचिः।
परेभ्यः स्यात् क्लेशो जननमरणव्याधिनिलयः।
यदात्मानं शुद्धं कलयति शिवाकारमचलं
तदा तेभ्यो मुक्तो भवति हि तदाह श्रुतिरपि॥
॥३८५॥

जोवर आपण देह हाच खरा मानतो तोवर आपण या जन्म मृत्युच्या चक्रात अडकून राहणार. आणि ज्या क्षणी आपले खरे अलौकिक ब्रह्मस्वरूप कळेल त्या क्षणी मुक्त होणार. देहबुध्दी न आत्मबुध्दी करावी.

छांदोग्य उपनिषद — ८ वा अध्याय १२वा खंड - ३ मंत्र

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


Courage is being scared to death - but saddling up anyway.
www.madhaveelagnuveer.com

१८ जुलै २०१७



स्वात्मन्यारोपिताशेषाभासवस्तुनिरासतः।
स्वयमेव परं ब्रह्म पूर्णमद्वयमक्रियम्॥३८८॥

आत्मस्वरूपावर आरोपित सर्व वस्तुंचा भास नाहीसा झाल्यावर आत्माच परिपूर्ण, अद्वय, निष्क्रिय असे परब्रह्म होतो. भेद नाहीसा होतो. थेंबुटा सागरी बुडाला.

समाहितायां सति चित्तवृत्तौ
परात्मनि ब्रह्मणि निर्विकल्पे।
न दृश्यते कश्चिदयं विकल्पः
प्रजल्पमात्रः परिशिष्यते ततः॥३८९॥

निर्विकल्प, परमात्मस्वरूप ब्रह्माठायी चित्तवृत्ती एकाग्र झाली असता हा विश्वाचा भास दिसेनासा होतो आणि मग उरते केवळ वाचारम्भण) व्यर्थ बडबड।
छांदोग्य – श्वेतकेतू व आरुणी संवाद.
एक मातीचा गोळा कळला की त्यापासून बनलेले सर्व पदार्थ (पणती, घट, कळश, कुंडी) कळतात. ही आकारभेदानुसार दिली गेलेली नावे हे त्यांचे सत्यस्वरूप नसून ही सुद्धा व्यर्थ बडबडच आहे.

असत्कल्पो विकल्पोऽयं विश्वमित्येकवस्तुनि।
निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः॥
द्रष्टा दर्शन दृश्यादि भावशून्यैकवस्तुनि।
निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः॥
कल्पार्णव इवात्यन्तपरिपूर्णैकवस्तुनि।
निर्विकारे निराकारे निर्विशेषे भिदा कुतः॥
तेजसीव तमो यत्र विलीनं भ्रान्तिकारणम्।
अद्वितीये परे तत्त्वे निर्विशेषे भिदा कुतः॥

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

या चारही श्लोकांत निर्विकारं निराकारं निर्विशेषं भिदा कुतः। हेच पालुपद आहे. या प्रश्नातच त्याचे उत्तर आहे.

विश्व हा ब्रह्मावरील भास आहे. ती केवळ मिथ्या कल्पना आहे. द्रष्टा, दर्शन व दृश्य ही त्रिपुटी ब्रह्माठायी नाही. ब्रह्म त्यापलीकडे आहे. जसा अंधार प्रकाशात विलीन होतो तसे अज्ञान ब्रह्मात विलीन होते.

ब्रह्माच्या ठिकाणी भेद, वैविध्य, नानात्व नाही.

एकात्मके परे तत्वे भेदवार्ता कथं भवेत्।
सुषुप्तौ सुखमात्रायां भेदः केनावलोकितः॥४०४

एकात्म अशा परमात्मतत्वाठायी भेद असणे कसे शक्य आहे? केवळ सुखरूप अशा सुषुप्तीत भेद असेल का? गाढ झोपेत केवळ आनंदच असतो. इतर भेद नसतात.

न ह्यस्ति विश्वं परतत्वबोधात्
सदात्मनि ब्रह्मणि निर्विकल्पे।
कालत्रये नाप्यहिरीक्षितो गुणे
न ह्यम्बुबिन्दुर्मृगतृष्णिकायाम् ॥४०५॥

परमात्मतत्वाचे ज्ञान झाल्यामुळे निर्विकल्प ब्रह्माठायी विश्व असत नाही. त्यानंतर दोरीवर सर्प वा मृगजळ-जलबिंदू कधीच दिसणार नाही.

मायामात्रमिदं द्वैतमद्वैतं परमार्थतः।
इति ब्रूते श्रुतिः साक्षात् सुषुप्तावनुभूयते ॥४०६॥

द्वैत ही केवळ माया आहे आणि अद्वैत हेच खरे आहे असे जे श्रुति म्हणते, त्याचा अनुभव सुषुप्तीत येतो.

October 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | |


Be content with your lot; one cannot be first in everything.

TUESDAY
NOV'16
1
306-060 WK-44

कठ, मुण्डक, छान्दोग्य, बृहदारण्यक यां उपनिषदांमध्ये सुध्दा 'परब्रह्म हेच सत्य' आणि द्वैतविश्व हा भास असे सांगणारी अनेक वचने आहेत. या श्लोकातील 'श्रुति' या शब्दातून हे संदर्भ उलगडत जातात.

तमेव भान्तमनुभाति सर्वं ।
तस्य भासा सर्वमिदं विभाति।

हे वचन थोड्याफार फरकाने २-३ उपनिषदात येते मात्र आचार्य यापुढे जाऊन सांगतात की द्वैत मिथ्या व ब्रह्म सत्य असल्याचा अनुभव सुषुप्तित येतो. सुषुप्तित विश्वाचे भान नसते. तिथे केवळ चैतन्य असते. सर्वकाळ जी गोष्ट अस्तित्वात असते तीच खरी, शाश्वत असते. चैतन्य नेहमीच अस्तित्वात आहे. तिन्ही अवस्थात ते असतेच.

यत्स्वप्नजागरसुषुप्तमवैति नित्यं

अनन्यत्वमधिष्ठानादारोप्यस्य निरीक्षितम् ।
पण्डितै रज्जुसर्पादौ विकल्पो भ्रान्तिजीवनः ॥४०७॥

रज्जुसर्प इ० मध्ये अधिष्ठानाचे आरोपिताशी अनन्यत्व विद्वानांनी पाहिले आहे. भ्रांतिमुळेच विकल्प निर्माण होतो
अधिष्ठान म्हणजे आधार ——→ रज्जु
(सर्प) आरोप्य म्हणजे ज्या वस्तूचा आरोप अधिष्ठानावर होतो
चुकीच्या ज्ञानामुळे (भ्रमामुळे) भास होत असतो.

चित्तमूलो विकल्पोऽयं चित्ताभावे न कश्चन ।
अतश्चित्तं समाधेहि प्रत्यग्रूपे परात्मनि ॥४०८॥

हा भास मनामुळे होतो. आणि मन नाहीसे झाले की काहीच उरत नाही. ∴ परमात्म्यावर मन (एकाग्र) कर.

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |


If you are not criticized, you may not be doing much.

www.madhavveeraguruveer.com

ही भ्रांति निर्माण कशामुळे होते? तर मनाच्या सतत चालू असणाऱ्या संकल्प-विकल्पामुळे!
मन नाहीसे झाले की भास थांबतात.
त्या मनाला ब्रह्माठायी एकाग्र केले की इतर विषय मनात प्रवेश करत नाहीत. मन 'अमन' होते.
लहान मुलाला आकर्षक, नवीन, मोठे खेळणे मिळाले की जुन्या खेळण्यांची आठवणही उरत नाही. त्यामुळे त्या मोडक्या खेळण्यांमुळे इजा, दुःख होईल ही भीतीही संपून जाते. हा माणसाचा स्वभाव आहे.

किमपि सततबोधं केवलानन्दरूपं
निरुपममतिवेलं नित्यमुक्तं निरीहम्।
निरवधि गगनाभं निष्कलं निर्विकल्पं
हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ॥४०९॥

विद्वान मनुष्य समाधी अवस्थेत सदैव ज्ञानरूप, आनंदरूप, अनुपम, कालातीत, नित्यमुक्त, निरिच्छ, निःसीम निरवयव, निर्विकल्प असे पूर्ण ब्रह्म हृदयात धारण करतो.
अतिवेलम - मर्यादांच्या पलीकडचे.

प्रकृतिविकृतिशून्यं भावनातीतभावं
समरसमसमानं मानसम्बन्धदूरम्।
निगमवचनसिद्धं नित्यमस्मत्प्रसिद्धं
हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ॥४१०॥
अजरममरमस्ताभासवस्तुस्वरूपं
स्तिमितसलिलराशिप्रख्यमाख्याविहीनम्।
शमितगुणविकारं शाश्वतं शान्तमेकं
हृदि कलयति विद्वान् ब्रह्म पूर्णं समाधौ ॥४११॥

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

अजर, अमर, आभासरहित, वस्तुस्वरूप, निश्चल झालेल्या समुद्राप्रमाणे असलेले, नामरूपरहित, गुणांच्या विकारांपलीकडे असलेले, शाश्वत शांत व एकमेव असे हे पूर्ण ब्रह्म, विद्वान समाधिअवस्थेत हृदयात धारण करतो.

ब्रह्मरूपाचा ठाका मनाला लागला की ज्ञानी मनुष्य समाधी अवस्थेत सतत ब्रह्मतत्त्वाचेच चिंतन करतो. शाश्वत, शांत गुणातीत असे ब्रह्म हा एकच ध्येयविषय होतो. या तीन श्लोकांचे पालुपद हेच आहे.

समाहितान्तःकरणः स्वरूपे
विलोकयात्मानमखण्डवैभवम् ।
विच्छिन्धि बन्धं भवगन्धगन्धितं
यत्नेन पुंस्त्वं सफलीकुरुष्व ॥४१२॥

स्वरूपावर मन एकाग्र केल्यावर तू अखंड ऐश्वर्ययुक्त आत्म्याला पहा. भवरूपी गंधाने गंधित झालेला बंध तोड आणि प्रयत्नपूर्वक पौरुष सफल कर.

खरा पुरुषार्थ कोणता तर आत्मज्ञान करून घेणे आणि जन्ममरणाच्या चक्रातून मुक्तता मिळवणे. आता हे चक्र थांबवण्यासाठी कर्मबंधन लागू द्यायचा नाही. त्यासाठी निःस्पृहपणे काम करायचे. कोणतीही इच्छा अपेक्षा मनात न ठेवता काम करण्यासाठी दृढनिश्चय लागतो. मनावर संयम हवा. मीपणा विसरणे ही सोपी गोष्ट नव्हे. पण प्रयत्नाने जमण्यासारखी आहे.

मी माझे ऐसी आठवण
विसरले जयाचे अंतःकरण

सर्वोपाधिविनिर्मुक्तं सच्चिदानन्दमद्वयम् ।
भावयात्मानामात्मस्थं न भूयः कल्पसेऽध्वने ॥४१३॥

सर्व उपाधितून पूर्ण मुक्त अद्वितीय, सच्चिदानंद अशा आपल्या अंतःकरणात स्थित असलेल्या आत्म्याचे चिंतन कर म्हणजे हा मार्ग पुन्हा तुझ्यासाठी असणार नाही.
सतत आत्मस्वरूपाचे चिंतन केल्याने हा संसरणाचा मार्ग तुझ्यासाठी असणार नाही. माणूस एकदा सांसारिक गोष्टींपासून मुक्त झाला, मनाने दूर गेला की त्यात तो अडकत नाही. देहाने यंत्रवत् व्यवहार केला तरी तो त्यात आसक्त होत नाही.

छायेव पुंसः परिदृश्यमानं
आभासरूपेण फलानुभूत्या ।
शरीरमाराच्छववत् निरस्तं
पुनर्न संधत्त इदं महात्मा ॥४१४॥

पूर्वजन्मीच्या कर्मफलांच्या अनुभवाने सावलीसारखा दिसणारा पुरुषाचा हा देह शवाप्रमाणे बाजूला टाकला की महात्मा त्या देहाला पुन्हा धारण करत नाही.
एकदा देहाविषयीचे ममत्व गेले की तो कुठेही पडला तरी त्याला त्याचा मोह उरत नाही. आपल्या नसलेल्या वस्तूविषयी आपण बेफिकिर असतो. देहतादात्म्य संपते.

सततविमलबोधानन्दरूपं समेत्य
त्यज जडमलरूपोपाधिमेतं सुदूरे ।
अथ पुनरपि नैव स्मर्यतां वान्तवस्तु
स्मरणविषयभूतं कल्पते कुत्सनाय ॥४१५॥

www.madhaveeraghuveer.com

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

DEC

SATURDAY

NOV'16

5

310-056 WK-44

स्थूल शरीराचे वर्णन करत असताना ते मल, मांसादि निंद्य वस्तूंनी बनले आहे. असे सांगून पुढे म्हणतात. उकरून टाकलेल्या पदार्थांची आठवणही ज्याप्रमाणे अंगावर शहारे आणते तशी स्थूलदेहाची उपाधि तिरस्करणीय आहे. एकदा का शरीर-मन-बुद्धी या उपाधींचा त्याग केला की पुन्हा त्यांचे स्मरणही नको. आत्यंतिक घृणा वाटली पाहिजे.

सिद्ध पुरुष हा देहाची कधीच पर्वा करत नाही. ऐहिक अस्तित्वाबद्दल तो कमालीचे दुर्लक्ष करतो.

समूलमेतत्परिदह्य वह्नौ
सदात्मनि ब्रह्मणि निर्विकल्पे।
ततः स्वयं नित्यविशुद्धबोधा
नन्दात्मना तिष्ठति विद्वरिष्ठः॥४१६॥

श्रेष्ठ विद्वान हे संपूर्ण विश्व सत्यस्वरूप, निर्विकल्प अशा ब्रह्मरूपी अग्नित पूर्णतः जाळून नंतर स्वतः नित्यज्ञानरूपाने आनंदरूपाने राहतो.

अग्नी व ब्रह्म दोन्ही प्रकाशरूप, सर्वव्यापक आहे आणि त्यात सर्व गोष्टी लय पावतात. अशा निर्विकल्प ब्रह्मात सर्व उपाधी विलीन करून विद्वान नित्य ज्ञानरूपात राहतो.

प्रारब्धसूत्रग्रथितं शरीर
प्रयातु वा तिष्ठतु गोरिव स्रक्।
न तत्पुनः पश्यति तत्त्ववेत्ता
नन्दात्मनि ब्रह्मणि लीनवृत्तिः॥४१७॥

गाय जशी गळ्यातील माळेविषयी तसे प्रारब्ध सूत्रात गुंफलेले हे शरीर जावो वा राहो, त्याविषयी, स्वरूप

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



Don't ask for a light load, but rather ask for a strong back.

# (३९) – जीवनमुक्तीची लक्षणे – ४१५ ते ४४२

SUNDAY
NOV'16
6
311-055 WK-44

ब्रह्माठायी ज्याचे मन एकाग्र झाले आहे असा तत्त्वज्ञ पुन्हा विचार करत नाही.

ज्याला स्वर्गीय संगीताचा आस्वाद मिळाला त्याचे लक्ष इतर संगीताकडे जात नाही. तसेच ज्याला 'अहं ब्रह्मास्मि' हे कळले त्याला देहाविषयी आस्था किंवा प्रेम वाटत नाही. त्यासाठी गाईच्या गळ्यातील हाराचा दृष्टांत दिला आहे. हारामे आपण तिला गौरवतो परंतु त्याचे तिला काही वाटत नाही.

नौकामध्ये कोणी राहे। त्याची मेळणी न होये।
तैसे असावे संसारी। जोवरी प्राचीनाची दोरी॥

असे नाथ महाराज म्हणतात. [प्रारब्ध]

देह म्हणजे अनावश्यक सजावटच आहे.

अखण्डानन्दमात्मानं विज्ञाय स्वस्वरूपतः।
किमिच्छन् कस्य वा हेतोर्देहं पुष्णाति तत्त्ववित्॥४३८॥

स्वस्वरूपाने अखंड आनंदरूप आत्म्याला जाणल्यावर कोणत्या इच्छेने व कोणत्या कारणासाठी तत्त्वज्ञानी देहाचे पालन करतो? आपली स्वर्गीय गानक्षमता कळल्यावर कोकिळ व्यर्थ कलकलाट करण्यात सूर मिसळेल का? तसेच ब्रह्मज्ञान झाल्यावर देहाच्या काळजीत व्यर्थ वेळ घालवत नाही.

संसिद्धस्य फलं त्वेतत् जीवन्मुक्तस्य योगिनः।
बहिरन्तः सदानन्दरसास्वादनमात्मनि॥४३९॥

मोक्षप्राप्त झालेल्या योग्याला सर्वत्र आनंदाचाच अनुभव येतो (कधी आनंदाची अनुभूती आली की ती थांबत नाही). अगदी जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी तो आनंदरसाचा आस्वाद घेतो. आत बाहेर हा भेदही संपून जातो आत्मा पिंडात व ब्रह्मांडात आनंदरूपच आहे.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |



www.madhavaraghuveer.com

३ ऑगस्ट २०१६

अग्नी हा यज्ञवेदीत ज्या स्वरूपाचा असतो, तसाच तो शेकोटीतही ज्वालारूप, प्रकाशरूप असतो. आत्माही सर्वत्र चैतन्यरूपच असतो.

प्रेम ही भावना सर्वत्र एकाच स्वरूपाची असते. देश, काळ, परिस्थितीप्रमाणे त्याच्या आविष्काराचे प्रकार वेगळे असतात. 'अन्नावर ओढ' हा सामायिक घटक आहे. तसाच आत्मा सर्वत्र आनंदरूपच आहे.

वैराग्यस्य फलं बोधो बोधस्योपरतिः फलम्।
स्वानन्दानुभवाच्छान्तिरेषैवोपरतेः फलम्॥४२०॥

वैराग्याचे फळ ज्ञान, ज्ञानाचे फळ उपरति आणि उपरतीचे फळ म्हणजे स्वानंदानुभवातून शांती हे आहे.

साधनचतुष्टयातील वैराग्य म्हणजे इहामुत्रफलभोग-विराग आहे. ऐहिक व पारलौकिक सुखाविषयी उदासीन असणे हा भाव इथे सांगितला आहे. आणि असा भाव असेल तरच संसारातून बाजूला होता येते. विषय हे विषम आहेत, अनित्य आहेत हे एकदा कळले की मग 'नित्य' काय याचा शोध घ्यावासा वाटतो.

आणि केवळ ब्रह्म हेच शाश्वत-नित्य आहे हे समजले की अशाश्वत गोष्टींमध्ये मन रमत नाही. म्हणूनच वासनांचा उपशम होतो याला उपरती म्हटले आहे. ही उपरति साधली की शाश्वत आनंदाचा लाभ होतो. मन एकदा बाह्यविषयातून विरक्त झाले की अंतर्मुख होते आणि केवळ अंतर्मुख मनालाच शाश्वत शांतीचा अनुभव येतो.

सिंहाच्या छाव्याला एकदा स्वरूप समजले की तो मेंढ्यांच्या कळपात रमणार नाही. आत्मज्ञान झाले की सामान्य गोष्टींविषयी आपोआपच अलिप्तता येते इथे एकावर एक अवलंबून आहे. म्हणजे उपरति हे ज्ञानाचे साधनही आहे व फळही आहे. कोंबडी व अंडे

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



Courage is the ladder on which all the other virtues mount.

मन जितके शांत तितके सुख अधिक)

यद् यद् उत्तरोत्तराभावं पूर्वपूर्वं तु निष्फलम्।
निवृत्तिः परमा तृप्तिरानन्दोऽनुपमः स्वतः॥४२१॥

जर नंतर नंतरच्या गोष्टींचा (उत्तरोत्तर) अभाव असेल तर आधीची गोष्ट व्यर्थ ठरते. निवृत्ती ही श्रेष्ठ अशी तृप्ति आहे. आनंद हा स्वतःच अनुपम आहे.

साखळीतील पुढच्या दुवा बळकट हवा नाहीतर मागचा दुवा कमकुवत होतो (स्वेटर) प्रत्येक नंतरची गोष्ट ही आधीच्या गोष्टीचा परिणाम आहे. आणि प्रत्येक आधीची गोष्ट नंतरच्या गोष्टीचे कारण आहे. कार्य घडले नाही तर कारण उणे पडते, [illegible] ठरते.

वैराग्य हवे ते ज्ञानासाठी. परंतु ज्ञान होणार नसेल तर वैराग्यात उणीव आहे असे मानावे.

मात्र जर वैराग्यामुळे ज्ञान ज्ञानामुळे उपरति ही साखळी पूर्ण झाली तर संसारातून निवृत्ति सहज होते. समाधान लाभते. अनुपम आनंदाचा लाभ होतो.

दृष्टदुःखेष्वनुद्वेगो विद्यायाः प्रस्तुतं फलम्।
यत्कृतं भ्रान्तिवेलायां नानाकर्म जुगुप्सितम्।
पश्चात् नरो विवेकेन तत्कथं कर्तुमर्हति॥४२२॥

अनुभवाला येणाऱ्या दुःखाविषयी उद्वेग न वाटणे हे विद्येचे (ज्ञानाचे) प्रत्यक्ष फल आहे. भ्रम झाला असताना जे विविध प्रकारचे निंद्य कर्म केले जाते ते विवेकज्ञान झाल्यावर माणूस कसा बरे करेल? मुळीच करणार नाही. Rhetorical Question.

स्थितप्रज्ञ लक्षणे

१. दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः।
२. रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिन्द्रियैश्चरन्।

WEDNESDAY

NOV'16

9

314-052 WK-45

एकदा ज्ञान झाले की अनुभवाला येणाऱ्या दुःखाची तीव्रता कमी होते. ते तितकेसे जाचक वाटत नाही. त्याची धार बोथट होते. आणि त्यामुळेच भ्रमात (अज्ञानात) जसे निंद्य कृत्य हातून केले जाईल तसे कृत्य विवेक जागा झाल्यावर कसे काय होईल? या प्रश्नातच उत्तर अनुस्यूत आहे. एकदा ज्ञान झाले की मनुष्याची अहंता नष्ट होते. आणि त्यामुळे सुखदुःखे संपतात.

म्हणजे खऱ्या अर्थाने संपत नसली तरी माणूस ज्ञानामुळे अलिप्त झाल्यामुळे त्यात्यात गुंतत नाही.

संतांवर इतकी संकटे आली तरी ते त्यामुळे अस्वस्थ होत नाहीत. खचून जात नाहीत. कमकुवत मनाची माणसे कलहाला प्रवृत्त होतात. आत्महत्या करतात. जीवनाला विन्मुख होतात.

एकदा शाळेत गेलेला मुलगा पुन्हा पहिलीत जात नाही. लहान मूल एकदा चालायला लागले की पुन्हा रांगत नाही. तसेच एकदा आत्मज्ञान दृढ झाले की पुन्हा सुखदुःखाने तो व्यथित होत नाही. तर तो त्यापलीकडे जातो. ही अवस्था हेच ज्ञानाचे फळ आहे.

विद्याफलं स्यादसतो निवृत्तिः
प्रवृत्तिरज्ञानफलं तदीक्षितम्।
तज्ज्ञाज्ञयोर्यन्मृगतृष्णिकादौ
नो चेद्विदो दृष्टफलं किमस्मात् ॥४२३॥

असत् पदार्थाचा नाश हे ज्ञानाचे फळ आणि (असत् पदार्थांकडे) प्रवृत्ती हे अज्ञानाचे फळ आहे. हे मृगजळ इ. चे जाणकार व त्याबाबतीत अज्ञान असणारे यांच्याबाबतीत कळून येते. नाहीतर ज्ञानी लोकांना तरी प्रत्यक्ष फळ दुसरे काय बरे मिळालेले असते?

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |



Any mind that is capable of real sorrow is capable of good.

www.madhaveeraghuveer.com

भिद्यते हृदयग्रन्थिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।
क्षीयन्ते चास्य कर्माणि तस्मिन् दृष्टे परावरे॥ मुण्डक ३.१.८



मागील श्लोकात दुःखातही अनुद्विग्न मन राखणे हे ज्ञानाचे फळ सांगितले होते. आता या श्लोकात असतांची निवृत्ति सांगत आहेत.

ज्ञान असेल तरच मिथ्या गोष्टींचा नाश वा निरास होतो. आणि हे ज्ञान म्हणजे विवेकज्ञान आहे.

मृगजळ हा भास आहे हे ज्याला कळते तो तिकडे जात नाही. पण ज्याला ते खरे वाटते तो तिकडे धावत सुटतो. थोडक्यात ज्ञानामुळे अशाश्वत गोष्टींपासून दूर जाता येते. मिथ्यागोष्टींतून मन अलिप्त होणे हे ज्ञानी लोकांना मिळणारे प्रत्यक्ष फळ आहे.

अविद्येचा नाश हाच खऱ्या ज्ञानाचा परिपाक असतो. जेव्हा अध्यात्म केंद्राची अनुभूति येते तेव्हा तो अनात्म्यापासून दूर होतो. आणि अज्ञानाचा परिणाम म्हणजे प्रवृत्ति।

ज्ञानी माणसाला मृगजळाचा भ्रम कधीच कार्यप्रवृत्त करत नाही. ज्याने सत्यस्वरूप जाणले तो जगाच्या मागे धावत नाही. तो अंतर्यामी शांत प्रसन्न असतो.

अज्ञानहृदयग्रंथेर्विनाशो यद्यशेषतः
अनिच्छोर्विषयः किं नु प्रवृत्तेः कारणं स्वतः॥४२४॥

जर अज्ञानरूपी हृदयग्रंथींचा पूर्णतः नाश झाला तर विषयांविषयी निरिच्छ झालेल्याला प्रवृत्तीकडे वळवण्यासाठी कोणते नैसर्गिक कारण असेल का?

या प्रश्नातच त्याचे उत्तर आहे. केवळ अज्ञानामुळेच माणूस विषयासक्त होत असतो. एकदा का अज्ञान नाहीसे झाले की तो पुन्हा विषयांकडे कसा काय वळेल?

अज्ञानरूप हृदयग्रंथी ही उपनिषदातील संकल्पना आहे. ही ग्रंथी एकदा सुटली की प्रवृत्ति नाहीशी होते. अज्ञान हेच त्या प्रपंचवृक्षाचे मूळ आहे. मुळावर घाव घातला की फांद्या आपोआप खाली येतात.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

अज्ञान नाहीसे झाले की विश्वाचा पसारा संपतो जसे जादूगाराची जादू नाहीशी झाली की त्याने निर्माण केलेला खेळ, कबूतर, अरण्य संपून जाते वयाने मोठे झाल्यावर आपण काही खेळण्यांच्या मागे लागत नाही. परंतु लहान मुलांना रमवण्यासाठी कधी कधी खेळतोही. परंतु आपण लहान असताना जसे खेळत होतो तसे आता नक्कीच खेळत नाही. तसेच आत्मज्ञानाचे ज्ञान झाल्यावर व्यक्ती बाह्य जगात खेळत राहील परंतु जीवभाव आणि कामना यात गुंतून राहणार नाही.

वासनानुदयो भोग्ये वैराग्यस्य तदावधिः।
अहंभावोदयाभावो बोधस्य परमावधिः।
लीनवृत्तेरनुत्पत्तिर्मर्यादोपरतेस्तु सा॥४२५॥

जेव्हा भोग्य वस्तूंविषयी वासनेचा अभाव होतो तेव्हा वासनेची परिसीमा होते. अहंभावाच्या उदयाचा अभाव ही ज्ञानाची परिसीमा होय आणि लीन झालेल्या वृत्तींचा पुन्हा उदय न होणे ही उपरतीची चरमसीमा आहे.

वैराग्य, ज्ञान आणि उपरती यांची परमसीमा आचार्य येथे सांगतात.

भोग्यवस्तूविषयी तिरस्कार वाटणे, त्या वस्तू सुखद न वाटणे ही वैराग्याची प्रारंभिक अवस्था आहे, परंतु त्या वस्तूंविषयी कोणतीच भावना, इच्छा नसणे हा वैराग्याचा उत्कर्ष आहे.

तसेच अज्ञान नसणे, म्हणजे ज्ञान हे उघड असले तरी अहंकार हे अज्ञानाचे मूर्तस्वरूप आहे. त्यामुळे अहंकारातूनच अज्ञान वाढत जाते. त्यामुळे नुसता अज्ञानाचा अभाव न म्हणता अहंभावाचा अभाव हीच ज्ञानाची परमावधि म्हटले आहे

अहंकार - इच्छा - कर्म - कर्मफळ - जन्म - मृत्यू - अज्ञान.

जोवर अहंता आहे तोवर ज्ञान होतच नाही. कारण जोवर स्वतःच्या मोठेपणाच्या भ्रमात मनुष्य असतो तोवर तो इतरांच्या कर्तृत्वाकडे स्वच्छ दृष्टीने पाहू शकत नाही. त्यामुळे त्याला शाश्वततत्त्व समजू शकत नाही. काळ्या रंगाचा चष्मा लावला तर सर्व जग काळेच दिसते.

मात्र ज्ञान झाले की साऱ्या वृत्ती ब्रह्मरूपात लीन होतात. अशा लीन झालेल्या वृत्ती पुन्हा विषयांकडे न धावणे हा उपरतीचा प्रकार आहे.

वैराग्य, ज्ञान आणि उपरती या तिन्हींची प्राप्ती झाली की अनंत परमसुखाचा, अखंड बोधाचा अनुभव येऊ लागतो.

ब्रह्माकारतया सदा स्थिततया निर्मुक्त बाह्यार्थधीः
अन्यावेदितभोग्यभोगकलनो निद्रालुवत् बालवत्।
स्वप्नालोकितलोकवत् जगदिदं पश्यन् क्वचित् लब्धधीः
आस्ते कश्चिदनन्तपुण्यफलभुक् धन्यः स मान्यो भुवि॥

सदैव ब्रह्माकारवृत्तीने राहिल्यामुळे बाह्यपदार्थातून ज्याची बुद्धी मुक्त झाली आहे, जो निद्रावश मनुष्याप्रमाणे आणि बालकाप्रमाणे दुसऱ्यांनी समोर आणलेल्या उपभोग्य वस्तूंचा भोग घेतो, क्वचित जर विषयांकडे प्रवृत्ति झालीच तर स्वप्नात पाहिलेल्या जगाप्रमाणे या विश्वाकडे पाहतो. तो अनंत पुण्यांचे फळ भोगणारा पृथ्वीवर मान्यवर व कृतार्थ होतो.

समजा थंडीच्या दिवसात तुम्हाला झोपलेले पाहून कुणीतरी तुमच्या अंगावर ब्लँकेट घालते तेव्हा तुमच्या देहाला उबदार वाटते. परंतु अंतर्मनाला त्याची जाणीवही नसते. लहान मुलाला योग्य रितीने खाऊ घालत जात तेव्हा त्याला स्वतःला त्याबद्दल जाणीवही नसते



www.madhaveeraghuveer.com

साक्षात्कारी मानव असेच कमालीचे धन्य आणि सुखी असतात. आत्मतत्त्वात लीन असतात. असे लोक जगात मान्य असतात.

स्थितप्रज्ञो यतिरयं यः सदानन्दमश्नुते।
ब्रह्मण्येव विलीनात्मा निर्विकारो विनिष्क्रियः॥४२७॥

(३६ श्लोक)

यत्र प्रविष्टा विषयाः परेरिता
नदीप्रवाहा इव वारिराशौ।
लिनन्ति सन्मात्रतया न विक्रियाम्
उत्पादयन्त्येष यतिर्विमुक्तः॥४४२॥

पू. आचार्यांनी वर्णन केलेला हा जीवन्मुक्त आणि गीतेतील स्थितप्रज्ञ यांच्यात बऱ्याच अंशी साधर्म्य आहे. पू. विनोबांनी देखील 'त्याची प्रज्ञा स्थिरावली' असे त्याचे वर्णन केले आहे. जीवन् (एव मुक्तः) असा हा समास सोडवायचा आहे. म्हणजे असा योगी पुरुष जीवनातून मुक्त झालेला नसतो तर जीवन जगत असतानाच मुक्त झालेला आहे.

अध्यात्मातील अंतिम ज्ञेय विषय म्हणजे ब्रह्म आणि आत्मा यांचे ऐक्य / अद्वैत आहे. हे ज्ञान ग्रहण करणारी निर्विकल्प अशी जी वृत्ती, तिला प्रज्ञा असे म्हटले जाते. ती त्याच्याकडे सदैव स्थिर असते. त्याला इथे जीवन्मुक्त म्हटले आहे. त्याच्या दृष्टीने प्रपंच विस्मृतीत गेला आहे. प्रपंचाचे भान नाही तो गौण मानतो. म्हणूनच त्याची बुद्धी ब्रह्मतत्त्वात विलीन झाली आहे आणि जागृतीतील धर्मापासून अलिप्त आहे. त्याला कशाचीही इच्छा नाही, तो अवयवी असूनही निरवयव आहे. त्याचे मन असून नसल्यासारखे आहे. त्याने धारण केलेल्या देहाबद्दलही त्याला अहंता नाही ममता नाही. तो भूतकाळात रमत नाही. भविष्यकाळाला





I speak for the trees, for the trees have no tongues.

विचार करत नाही आणि वर्तमानकाळविषयी सुध्दा उदासीन असतो. कशाहीबद्दल विशेष प्रेम किंवा विशेष द्वेष नसणे. सर्व वस्तूंबद्दल समभाव असणे हेही जीवन्मुक्ताचे लक्षण आहे.

सूर्यनमस्कार घालताना व्यक्तीने प्रत्येक नमस्कारानंतर सूर्याकडे पहावे आणि नंतर स्वतःच्या आपल्या सावलीकडे पहावे. असे केल्याने ग्रहांचे कोणतेही वाईट परिणाम त्याच्यावर होत नाहीत. अशी समजूत आहे.

जाणिवेच्या महान प्रकाशाने प्राप्त झालेल्या जीवन्मुक्ताचे देहाशी असलेले नाते सावलीसारखेच असते. सावलीवर होणाऱ्या छळणुकीचा परिणाम त्याच्यावर काहीही होत नाही. म्हणजेच सावलीवरून एखादा ट्रक गेला किंवा कुणी सावलीला दगड मारला किंवा सावली चिखलात पडली तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम व्यक्तीवर होत नाही, त्याचप्रमाणे जीवन्मुक्ताचे देहाशी असलेले नाते सावलीप्रमाणे असते.

इष्ट किंवा अनिष्ट - काहीही प्राप्त झाले तरी दोन्हीविषयी तो तटस्थ असतो. हार किंवा प्रहार त्याला विचलित करू शकत नाहीत. देह व इंद्रिये यांच्या कार्यात 'ना मी-माझे' हा भाव राखून अलिप्तपणे राहतो तो जीवन्मुक्त!

ज्याला स्वतःचा देह व इंद्रिये याविषयी अहंभाव नाही किंवा इतर वस्तूंविषयी इदं भाव नाही तोच खरा जीवन्मुक्त! कारण तो आत्मा, ब्रह्म, विश्व या सर्वांमध्ये कोणताही भेद मानत नाही. ज्याला सज्जनांकडून मान मिळाला किंवा दुर्जनांकडून त्रास दिला गेला तरी दोन्हीकडे तो समभावाने बघतो. तुकाराम महाराज
रामेश्वरभट्ट - तुका बिघडू नाही तुम्ही - स्तुति
मंबाजी - काटेरी झुडुपान मारले. सोसे-मासे निंदा

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

Patience is bitter, but its fruit is sweet.



www.madhaveeraghuveer.com

882

त्याच्या ठिकाणी विषय दुसऱ्यांच्या इच्छेने प्रवेशतात व नदीचे प्रवाह ज्याप्रमाणे समुद्राशी एकरूप होतात, त्याप्रमाणे केवळ सत्स्वरूपात विलीन होतात, विकार उत्पन्न करीत नाहीत तो हा संन्यासी पूर्णतः मुक्त असतो.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठम् - - - - - - -

असा हा जीवन्मुक्त सदैव आनंदी असतो. योगरतो - - -

देहाकडून जी कर्मे घडणे आवश्यक आहे तो ती कर्मे करत असतो. ती तो टाळत नाही. मात्र त्यांच्यात तो आसक्तही असत नाही. यांत्रिकपणे व्यवहार करत असतो. त्यातून धन, मान, कीर्ति या कशाचीही अपेक्षा करत नाही.

ज्ञान झाल्यामुळे त्याला देहाचा मोह नसतो. देह त्याच्या दृष्टीने नगण्य असतो. देहावर अहंता नाही वा ममता!

समर्थांनी नुसते 'कल्याणा, छाटी उडाली' असे म्हणताक्षणीच देह दरीत लोटून देणारे कल्याणस्वामी हे जीवन्मुक्तच आहेत.

समदर्शित्व हे आणखी एक जीवन्मुक्ताचे वैशिष्ट्य!

जिकडे पहावे तिकडे भासे।
होवो लागला त्याचा ध्यास॥

असे सर्वत्र केवळ ब्रह्मरूपच दिसू लागते.

इष्ट / अनिष्ट हे सारे आविष्कार एका ब्रह्माचेच असल्यावर दोन्हीही सारखेच. गुलाबाच्या फुलामध्ये जसे ब्रह्म आहे, तसेच काट्यांमध्येही ब्रह्म आहे.

तेरे फूलोंसे भी प्यार, तेरे कांटोंसे भी प्यार।
जो भी देना चाहे दे दे, करतार दुनियाके पालनहार॥

हा नेहमीच ब्रह्मानंदात मग्न असल्याने त्याचे भौतिक गोष्टीत लक्षच नसते. तो अनभिज्ञ असतो. त्यासाठी आचार्य अंतर्बाह्य अज्ञान (४३६) असा शब्द वापरतात. कपडेलत्ते, खाद्य पदार्थ, घर संसार, दागिने यामध्ये जीवन्मुक्ताला काहीही स्वारस्य नसते.

www.madhaveeraghuveer.com

१० ऑगस्ट २०१८



या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी (२.६९)
हे गीतेतील वर्णन यथायोग्य आहे.
परंतु स्वास्थ्य नसताना तो सारे व्यवहार कसे करतो? असा कोणी आक्षेप घेऊ शकेल. त्याचे उत्तर असे आहे की त्याचा देह, इंद्रिये कार्यरत राहतात. मनाने तो अलिप्त असतो.

१. निरिच्छ मानस तरीही असावी उल्हासित वृत्ती।
२. गुणा गुणेषु वर्तन्ते
३. कुत्ता आने और चमडी जाने।

अशा या जीवन्मुक्ताकडे भेददृष्टी नसते. (८८०)
अहंभाव नाही म्हणून त्वंभाव नाही, तसेच इदंभावही नाही. जीव - ब्रह्म यांना तो एकच मानतो तसेच विश्व - ब्रह्म यांनाही तो एकच मानतो. यात त्याची निश्चयात्मिका प्रज्ञा त्याला सहाय्य करते.
त्याला त्रास देणारे किंवा गोड बोलणारे या दोहोंविषयी तो समभाव असतो. (८८९)

जो खांडावया घाव घाली। का लावणी जयाने केली।
दोघां एकचि सावली। वृक्ष दे जैसा॥

सुरभयाते मुखं कुठारस्य
तुकाराम महाराज - ब्रह्मभावाचा सहज आविष्कार.
शिवाजीमहाराज - नजराणा X रामेश्वरभट्ट - गाथा बुडवली
अशा या जीवन्मुक्ताच्या ठिकाणी दुसऱ्यांच्या इच्छेने विषय प्रवेशतात. हे कसे? - त्याला प्रापंचिक गोष्टीत रस नसला तरी जगरहाटी पाळावी लागते. तुकाराम महाराज किंवा गोंदवलेकर महाराज यांची पहिली पत्नी निवर्तल्यावर त्यांनी दुसरा विवाह केला तो संसाराच्या आसक्तीने नव्हे. इतरांनी भाग पाडले म्हणून जीवन्मुक्ताने कर्म केले तरी तो त्याला कर्मबंधनात पाडत नाहीत. कारण त्याच्या प्रमाणेच त्याची कर्मेही ब्रह्मरूपच होऊन जातात.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |



www.madhaveeragniveer.com

# (३२) ज्ञानामुळे कर्माचा क्षय

THURSDAY
NOV'16
17
322-044 WK-46

विज्ञातब्रह्मतत्त्वस्य यथापूर्वं न संसृतिः।
अस्ति चेन्न स विज्ञातब्रह्मभावो बहिर्मुखः॥
प्राचीनवासनावेगाद् असौ संसरतीति चेत्॥४४३॥
न सदेकत्वविज्ञानान्मन्दीभवति वासना॥४४४॥

ज्याने ब्रह्मतत्त्व जाणले, त्याला पूर्वीप्रमाणे संसरण नाही. जर असेल तर तो ब्रह्मतत्त्वाचा जाणकार नव्हे तो बहिर्मुख असला पाहिजे. पूर्वीच्या वासनांच्या प्रभावामुळे त्याला संसरण प्राप्त होते असेही म्हणता येणार नाही कारण एकदा अभेद जाणला (अद्वैत, ऐक्य) की वासना मंदावते.

अत्यंत कामुकस्यापि वृत्तिः कुण्ठति मातरि।
तथैव ब्रह्मणि ज्ञाते पूर्णानन्दे मनीषिणः॥४४५॥

अत्यंत लंपट असलेल्याची वृत्ति देखील मातेपाशी कुंठित होते. त्याचप्रमाणे पूर्णानंद ब्रह्माचे ज्ञान झाले की विद्वानाचे तसेच होते. मातेच्या जवळ आल्यावर लंपटपणाला खीळ बसते. तशी विद्वानांची वासना (असेल तर) ब्रह्मज्ञान होताक्षणीच संपून जाते.

— प्रारब्ध, संचित, क्रियमाण यांचा जीवनावरील प्रभाव —
ज्ञानामुळे कर्माचा क्षय —— ४४२ ते ४६३

यापुढील अभ्यास श्लोक न लिहिता केवळ विषयवार विवरण करत आहे.

कर्माचा अटळ सिद्धांत

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |


Courage, above all things, is the first quality of a warrior.

www.madhaveeraghuveer.com

कर्म प्रधान विश्व करि राखा
जो जस करई सो तस फल चाखा ॥
या कर्मांच्या कायद्यात कोठेही पळवाट नाही
वशिला नाही, अपवाद नाही, विलंब नाही.
१. क्रियमाण २. संचित कर्म ३. प्रारब्ध कर्म
क्रियमाण- सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत जी कर्मे करतो ती सर्व क्रियमाण कर्मे.
संचित - क्रियमाण कर्मांपैकी काही तत्काळ फळ देतात तर काही काळाने फळ देतात. कर्म तर केले परंतु अजून फळ मिळाले नाही अशा कर्मांना संचित कर्म असे म्हणतात.
प्रारब्ध - जे संचित कर्म परिपक्व होऊन फळ देण्यास तयार होते त्याला प्रारब्ध (सुरु झालेले) म्हणतात.
प्रारब्ध कर्म पुरेपूर भोगल्यानंतरच जीवात्मा देहातून सुटतो
केलेली सर्व कर्मे भोगावीच लागतात. म्हणून वाईट कर्म करण्यापूर्वी माणसाने हजार वेळा विचार करावा. कारण एकदा कर्म केल्यावर त्याचे फळ भोगावेच लागते.
दशरथ राजा - श्रावण बाळ हत्या, श्रीराम - वनवास
परीक्षित - अहो मया नीचमनार्यवत् कृतम्
निरागसि ब्रह्मणि गूढ तेजसि।
धार्मिकावर संकटे तर अधार्मिकाचे चांगले असे का होते?
दुष्टोऽपि राजा यदि सेवकेभ्यो
भाग्यात् परं नैव ददाति किञ्चित्।
अहर्निशं वर्षति वारिवाहः
तथापि पत्रत्रितयः पलाशः ॥

पत्रं नैव यदा करीर विटपे दोषो वसन्तस्य किम्।
नोलूकोऽप्यवलोकते यदि दिवा सूर्यस्य किं दूषणम्।
धारा नैव पतन्ति चातकमुखे मेघस्य किं दूषणम्।
यत् पूर्वं विधिना ललाटलिखितं तत् मार्जितुं कः क्षमः ॥

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

परंतु म्हणून पुरुषार्थ करूच नये असे नाही तर प्रारब्ध आणि पुरुषार्थ यातील सीमारेषा जाणून घ्यायला हवी. नोकरी मिळणे हे प्रारब्ध असेल परंतु ती नोकरी टिकवून बढती मिळवणे हा पुरुषार्थ आहे. - धर्म अर्थ काम मोक्ष यापैकी धर्म व मोक्ष यासाठी प्रयत्न करावा आणि अर्थ व काम प्रारब्धावर सोडून द्यावे.

आचार्यांनी इथे प्रारब्धकर्माचे (४४३ ते ४६०) विस्तृत विवेचन केले आहे.

एखादा ब्रह्मरूपाचा सदैव ध्यास घेतलेला, भिन्न ब्रह्माकार करणारा माणूस बाह्य, भौतिक व्यवहार करताना दिसतो. त्या कर्मातून त्याला काही भोगही मिळतात. त्याच्या या क्रियांना व त्याच्या फळांना श्रुति इथे प्रारब्ध असे म्हणते.

प्रारब्ध म्हणजे पूर्वजन्मीचे फलोन्मुख होणारे कर्म. हे कर्म प्रभावी असते ते शरीर असेपर्यंतच! देहाची उपाधि नसेल तर प्रारब्ध व त्यावर निर्माण होणारे भोग निर्माणच होत नाहीत.

मी ब्रह्म आहे असे ज्ञान झाल्यावर अनेकजन्मात मिळवलेले संचित कर्म नाहीसे होते.

स्वप्नात केलेले पाप वा पुण्य जागृतीमध्ये उरत नाही. त्याचा काही उपयोग नाही.

आकाश जसे घटाच्या उपाधिने किंवा त्यातील मद्याच्या गंधाने लिप्त होत नाही तसाच आत्मा देहाच्या उपाधिने आणि तिच्या धर्माने लिप्त होत नाही.

ज्ञान होण्यापूर्वी केलेले कर्म फळ दिल्याशिवाय संपत नाही. लक्ष्यावर सोडलेला बाण लक्ष्यवेध केल्याशिवाय परत येत नाही. वाघ समजून बाण सोडला असला आणि नंतर जरी ती गाय आहे असे समजले तरीही बाण

व्याघ्रबुद्ध्या विनिर्मुक्तो बाणः पश्चात्तु गोमतौ ।
न तिष्ठति छिनत्त्येव लक्ष्यं वेगेन निर्भरम् ॥

SUNDAY
NOV'16
20
325-041 WK-46

मध्यातून परत येत नाही. तो त्याच्या लक्ष्याचा भेद करतोच. तसेच प्रथम देहाला 'मी' समजून केलेली कार्ये मग मी म्हणजे आत्मा आहे हे कळले तरी फलद्रूप व्हायची राहत नाहीत. ती फलद्रूप होतातच.

विद्वानांचे प्रारब्ध बलवत्तर असते. ते भोगूनच संपवावे लागते.

भोगल्याविना सुटेना । देवादिका सर्वांसी ।

संचित व क्रियमाणाचा नाश स्वस्वरूपाच्या ज्ञानाने होतो परंतु प्रारब्ध हे भोगूनच संपवावे लागते.

ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात् कुरुते तथा ।

मनुष्य जागा झाल्यावर त्याचा स्वप्नसृष्टीशी काही संबंध नसतो तसेच ज्ञान्यांनी माणसाच्या प्रारब्ध कर्मांची चर्चा करणे चूक आहे. कारण त्याचे प्रारब्ध कार्यरत झाले असले तरी ते ज्ञान्याला बाधत नाही.

ज्ञानी माणूस प्रारब्धाने प्राप्त झालेल्या स्थूल व अनित्य देहाशी आणि देहाशी निगडित विश्वाशी फारशी पर्वा करत नाही. त्याला प्रारब्ध निर्मित देहाशी कर्तव्य नसते. तो टिकवून ठेवायचा नसतो. त्याचा अभिमान बाळगायचा नसतो वा समर्थनही करायचे नसते.

त्याला ब्रह्मस्वरूपाविषयी ओढ असते. अन्य काहीही त्याला दिसत नाही. देह असला तरी देहाच्या सर्व क्रिया यांत्रिकपणे होताना दिसतात. स्वप्नात पाहिलेल्या घरदार वस्तू यांचे अधूनमधून नकळतपणे जसे सहज स्मरण होत राहते, तशा यांच्या शारीरिक क्रिया होत राहतात. त्याचा त्याला त्रासही होत नाही.

समर्थ – कफाची व्याधी, शंकराचार्य – भगंदर, टेंबेस्वामी – अशक्तपणा. स्वरूपानंद (पावस) – गुरुदेव रानडे, योगी अरविंद

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

Courage is the price that Life exacts for granting peace.



www.madhaveeraghuveer.com

अध्यस्तस्य कुतः सत्वमसत्त्वस्य कुतो जनिः।
अजातस्य कुतो नाशः प्रारब्धमसतः कुतः ॥९६॥

अध्यस्त (आरोपित) वस्तूला अस्तित्व कुठून? आणि ज्याला अस्तित्व नाही, त्याला नाश कुठून? आणि अस्तित्व नसेल त्याला प्रारब्ध तरी कोठले?

प्रारब्धकर्मानुसार जीवाला देह प्राप्त होतो त्यामुळे प्रारब्ध हे देहाशी निगडित मानले आहे. ते अनादि आत्म्याला लागू होत नाही. कारण आत्मा काही कर्मापासून निर्माण झालेला नाही. आत्म्याला प्रारब्धाचा लेप लागत नाही. तसेच आत्मज्ञान्याला देखील प्रारब्ध बाधत नाही.

अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो
न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ कठोपनिषद् १.२.१८,

जोपर्यंत देह माझा व मी देहाचा अशी भावना असते तोवरच प्रारब्ध बाधत असते. कारण ते देहबुद्धीशी निगडीत असते. देहात्मभाव हाच मुळात दुःख निर्माण करणारा आहे. त्यामुळे त्यातून उत्पन्न झालेले प्रारब्धही त्याज्यच आहे.

आचार्य पुढे म्हणतात प्रारब्धकल्पना हा भ्रम आहे



www.madhavvairagi.com

## (33) ब्रह्मतत्त्वाठायी नानात्वाचा निषेध. ४६५ ते ४६७.

४६५ ते ४६७ या श्लोकात ब्रह्मतत्त्वाचे वर्णन आले आहे. या सर्व श्लोकांची दुसरी ओळ समान आहे.

एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किञ्चन॥

परिपूर्णमनाद्यन्तमप्रमेयमविक्रियम्।
एकमेवाद्वयं ब्रह्म नेह नानास्ति किंचन॥४६५॥

परिपूर्ण, अनादि, अनंत, अप्रमेय, अविकारी, एकमेव अद्वितीय असे हे ब्रह्म आहे. येथे अनेक काहीही नाही.

ब्रह्म भासते सृष्टिरूपाने। भेद बनती मीपणाने।
कल्पना सोडता अभेद बाणे। उरते केवळ अद्वैत॥
अविद्येने उपजे द्वैत। ते सोडूनि धरावे अद्वैत॥

भासमान ते तात्कालिक। त्यावरी भासे ते चिरकालिक।
जो नित्यानित्य जाणेल। त्याचे षड्रिपु श्रमतील॥
भासमान तेचि असत्य। त्यावरी भासे ते सत्य।
जाणावे अंतरी सत्यासत्य। संपावे जरी सुखदुःख॥
मायावरणा दूर सारिता। प्रत्यय येईल आनंदाचा।
ब्रह्म कंद जो आनंदाचा। अभ्यासाने अनुभव घ्यावा॥

हे ब्रह्म कसे आहे? तर अंतर्यामी, एकरस, पूर्ण, अनंत सर्वव्यापक असे हे ब्रह्म आहे. ते अहेय (अत्याज्य), अग्राह्य, अधार्य, निराश्रय आहे. ते निर्गुण, निरवयव, सूक्ष्म, निर्विकल्प, निरंजन आहे. त्याचे स्वरूप अवर्णनीय आहे. ते मनोवाचागोचरम् म्हणजे मन बुद्धिच्या कक्षेत येणार नाही. नित्य, सत्स्वरूप, ऐश्वर्ययुक्त, स्वयंसिद्ध, शुद्ध आणि ज्ञानरूप असे ते असले तरी ते अनीदृशम् म्हणजे 'असे आहे' असे सांगता न येणारे आहे इथे विविधता नावाला देखील नाही.

जिथे विविधता आहे तिथे अज्ञान आहे. आचार्य म्हणतात - भेद म्हणजे अज्ञान आणि अभेद म्हणजे ज्ञान। भगवद्गीतेत देखील पृथक् भावाला ज्ञानाची निम्न अवस्था (राजस ज्ञान) मानले आहे.

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान् पृथग्विधान्।

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

आणि ज्ञानाची सर्वोच्च अवस्था म्हणजे शुध्द सात्विकता।
सर्वभूतेषु ~~येन~~ येनैकं भावमव्ययमीक्षते।
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम्
विवेचनेने नटलेल्या या विश्वात एकत्व पाहणे
हेच खरे ज्ञान आहे. या ज्ञानाचा लाभ योगाने
वा भक्तिने देखील होऊ शकतो.
सात्विक ज्ञान म्हणजे मोक्षलक्ष्मीचे मंदिर आहे.
अविभक्तं ~~विभक्तेषु~~ च भूतेषु विभक्तमिव च स्थितम्।
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च॥
समं सर्वेषु भूतेषु तिष्ठन्तं परमेश्वरम्
विनश्यत्स्वविनश्यन्तं यः पश्यति स पश्यति॥
हा अविनाशी आत्मा राहतो मात्र नाशिवंत शरीरामध्ये!
त्याला जाणायचे असेल तर हे मायेचे आवरण दूर
करायला हवे. आणि हे ज्याला पाहता येते तोच खरा
ज्ञानी! नाथांनी गाढवाला पाणी पाजले ते केवळ
भूतदया म्हणून नाही तर खरोखर त्या तहानलेल्या
गाढवामध्ये असलेले ब्रह्मतत्त्व त्यांना दिसले. (बाबा आमटे)
यांची भूतदया आहे. कुरूप, रोगी महारोगी यांच्या
जखमा स्वच्छ करून त्यांच्यावर उपचार केले.

निरस्तरागा निरपास्तभोगाः
शान्ताः सुदान्ता यतयो महान्तः।
विज्ञाय तत्त्वं परमं तदन्ते
प्राप्ताः परां निर्वृतिमात्मयोगात्॥४७२॥
ज्यांची आसक्ती संपली आहे. जे भोगांपासून अलिप्त
झाले आहेत. जे शांत, दान्त, महान संन्यासी आहेत. असे ते
श्रेष्ठतत्त्व जाणले असता आत्मस्वरूपाच्या ज्ञानाने आनंदप्रत जातात.
भवानपीदं परतत्त्वमात्मनः
स्वरूपमानन्दघनं विचार्य।
विधूय मोहं स्वमनःप्रकल्पितं
मुक्तः कृतार्थो भवतु प्रबुद्धः॥४७३॥

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |

अंतःमधील परमात्मतत्त्व जाणून, आपल्या आनंद घनस्वरूपाचे चिंतन करून स्वतःच्या मनानेच कल्पिलेला मोह धुवून टाकून मुक्त होणे कृतार्थ हो.

इथे आचार्य नुसता उपदेश करून थांबत नाहीत तर आत्मज्ञानप्राप्तीच्या मार्गातील खाचखळगे उलगडून दाखवतात. आत्मज्ञानाची प्रमाणे सांगतात. मोक्षप्राप्ति, आत्मसाक्षात्कार हा अनुभूतीचा विषय आहे. तो ज्याचा त्यानेच करून घ्यायचा आहे. आचार्य उपदेश करत आहेत.

आत्मतत्त्व हे चर्मचक्षूंनी समजणार नाही. त्यासाठी ज्ञानचक्षु हवेत. कोणत्याही गोष्टीकडे पाहणे वा ऐकणे हे पुरेसे नाही. तर लक्षपूर्वक, व्यवस्थित पाहावे लागते.
To see – To watch. To hear – To listen.

आचार्यांचा ऐकण्यापेक्षा दर्शनावर भर आहे. कारण सांगणाऱ्याचे पूर्वग्रह त्यात मिसळलेले असतात. सांगणाऱ्याचे शब्दभांडार — अपुरे किंवा भरपूर — दोष. केवळ ऐकण्याने विकल्प निर्माण होतो. त्यासाठी प्रत्यक्ष अनुभव हवा. आणि त्याचा पडताळा विवेक व समाधीच्या सहाय्याने घ्यायला हवा. अनुभव हीच खात्री.

(५५) एकदा अज्ञानाचा बंध सुटला की चार प्रमाणे असतात. शास्त्र, (युक्ति), गुरु आणि अंतःसिद्ध अनुभव। युक्ति - आचार्य Additional
युक्ति म्हणजे तर्काधारे ब्रह्मतत्त्वाचा शोध घेणे
खरेतर ही स्वतंत्र प्रमाण नसून ही साखळी आहे.

शास्त्र — वेद उपनिषदांच्या अभ्यासातून सगुण व निर्गुण रूप जाणणे
युक्ति — प्राप्त शास्त्रज्ञानाला उलटसुलट तर्काच्या कसोटीवर परखणे.
गुरूपदेश — साधकाच्या अवस्थेला गुरुवचनावर श्रद्धा ठेवून स्थिर करणे
स्वानुभूति — गुरूंचा उपदेश स्वतः अनुभवणे.

मुक्याने गूळ खाल्ला गोडी न ये सांगायला।
प्रमाण म्हणजे ज्ञान मोजण्याचे साधन।
स्वानुभूति हे सर्वश्रेष्ठ प्रमाण आहे.



www.madhaveeraghuveer.com

(३४) आत्मस्वरूप ज्ञान आवश्यक

४७६ ते ४८० - बंध, मोक्ष

बन्धो मोक्षश्च तृप्तिश्च चिन्तारोग्यक्षुधादयः।
स्वेनैव वेद्या यज्ज्ञानं परेषामानुमानिकम्॥

काही गोष्टी स्वतःच अनुभवाव्या लागतात. मात्र दुसऱ्याचे ज्ञान हे अनुमानावर आधारित असते.

बंध किती व कसा जाचक असतो हे बंधनात असलेल्या माणसालाच कळू शकते. इतरांना बंधनातील दुःखही माहित नाही, तसेच मुक्तीचा आनंदही समजत नाही. इतर लोक केवळ देहबोलीवरून अनुमान करू शकतात. 'मला निसटायलाच हवं' - कादंबरीचा नायक.

४७७ - गुरु शिष्याला उपदेश करतात तो तटस्थ राहून! कारण प्रत्यक्ष ब्रह्म दाखवता येत नाही. मुमुक्षुला भवसागर पार करायचा असला तरी गुरु काठावर राहूनच मार्गदर्शन करतात. ते प्रत्यक्ष पाण्यात उतरत नाही.

तैत्तिरीय उपनिषद - भृगु वरुण संवाद - ब्रह्मज्ञान द्या - अधीहि भगवो ब्रह्म। असे म्हणतो तेव्हा वरुण त्याला तातडीने ब्रह्मज्ञान देत नाही. उलट त्याची लक्षणे सांगून 'तुझे तू जाणून घे' - तद् विजिज्ञासस्व असे सांगतो. कुठे अडला तर पुन्हा आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करतात. स्वप्रज्ञा - मोक्षाची वाट चोखाळावी. ही विवेकबुद्धी ईश्वरानुगृहीत असावी. (४७८ श्लोक)

४७८ या श्लोकात आचार्य आत्मलीन वृत्तीला अखंड स्वरूपस्थिति म्हणतात. आत्मलीनता म्हणजेच मोक्ष!

४७९ - ब्रह्मच जीव आहे व ब्रह्मच विश्व आहे. आणि अखंड स्वरूपस्थिति हाच मोक्ष आहे. ब्रह्म अद्वितीय आहे.

४८० - अशा रीतीने ज्ञानाच्या प्रमाणाच्या माध्यमातून ज्याने सत् तत्त्वाला जाणले आहे, ज्याची इंद्रिये शांत झाली आहेत. असा एकाग्रचित्त शिष्य काही काळ निश्चल वृत्तीने आत्मस्वरूपात स्थित झाला.



www.madhavveer.com

# (३५) शिष्याचे स्वानुभव कथन ४८१ ते ५२०

SATURDAY
NOV'16
26
331-035 WK-47

कंचित्कालं समाधाय परे ब्रह्मणि मानसम्।
व्युत्थाय परमानन्दादिदं वचनमब्रवीत्॥ ४८१॥

काही काळ परब्रह्माठायी मन एकाग्र करून नंतर परमानंद अवस्थेतून जागा होऊन शिष्य म्हणाला

शिष्याला 'अहं ब्रह्मास्मि' हा अनुभव आल्यानंतर जो आनंद त्याच्या शब्दाशब्दातून ओसंडताना दिसतो. शिष्याची ही अवस्था आचार्य वृत्तीविषयातून प्रकट करतात. हा सर्वश्रेष्ठ, शाश्वत आनंद आहे.

वाचा वक्तुमशक्यमेव मनसा मन्तुं न वा स्वाद्यते
स्वानन्दामृतपूरपूरितपरब्रह्माम्बुधेर्वैभवम्।
अम्भोराशिविशीर्णवार्षिकशिलाभावं भजन्मे मनो
यस्यांशांशलवे विलीनमधुनानन्दात्मना निर्वृतम्॥ ४८३

समुद्रात पडून विरघळणाऱ्या पावसाळ्यातील गारांप्रमाणे माझ्या मनाची अवस्था झाली आहे. ज्यातील अंशातील अंशात ते विलीन झाले आहे. आनंदरूपात स्थित झाले आहे. अशा त्या आत्मानंदाने परिपूर्ण अशा परब्रह्मरूपी सागराचे मनाने / बुद्धीने / वाणीने वर्णन करणे अशक्य आहे.

४८४. हे विश्व कुठे गेले? किंवा कुणी कुठे नेले? आत्ताच तर मी हे पाहिले होते? आता का बरे नाही?

४८५. या ब्रह्मरूपी महासागरात काय ग्राह्य व काय त्याज्य आहे? काय सामान्य व काय विलक्षण आहे?

४८३. इथे मला काही दिसत नाही. ऐकू येत नाही. काही कळत नाही. मी आत्मस्वरूपात स्थित असून विलक्षण आहे.

४८८. कृतज्ञतेने गुरूंना नमस्कार करत आहे. निःसंग, नित्य, अद्वय, आनंदस्वरूप, महान, अपार दयासागर गुरूंना नमन।

धन्योऽहं कृतकृत्योऽहं विमुक्तोऽहं भवग्रहात्
नित्यानन्दस्वरूपोऽहं पूर्णोऽहं त्वदनुग्रहात्॥४८९॥
असङ्गोऽहमनङ्गोऽहमलिङ्गोऽहमभङ्गुरः।
प्रशान्तोऽहमनन्तोऽहममलोऽहं चिरन्तनः॥४९०॥

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

A wise man will make more opportunities than he finds.



DEC

www.madhaveer.com

अकर्ताहमभोक्ताहमविकारोऽहमक्रियः ।
शुद्धबोधस्वरूपोऽहं केवलोऽहं सदाशिवः ॥४९४॥

नारायणोऽहं नरकान्तकोऽहं
पुरान्तकोऽहं पुरुषोऽहमीशः ।
अखण्डबोधोऽहमशेषसाक्षी
निरीश्वरोऽहं निरहं च निर्ममः ॥४९५॥

आरोपितं नाश्रयदूषकं भवेत्
कदापि मूढैर्मतिदोषदूषितैः ।
नार्द्रीकरोत्यूषरभूमिभागं
मरीचिकावारिमहाप्रवाहः ॥४९९॥

छायया स्पृष्टमुष्णं वा शीतं वा सुष्ठु दुष्ठु वा ।
न स्पृशत्येव यत्किंचित्पुरुषं तद्विलक्षणम् ॥५०५॥

जले वापि स्थले वापि लुठत्वेष जडात्मकः ।
नाहं विलिप्ये तद्धर्मैर्घटधर्मैर्नभो यथा ॥५१०॥

स्वाराज्यसाम्राज्यविभूतिरेषा
भवत्कृपाश्रीमहिमप्रसादात् ।
प्राप्ता मया श्रीगुरवे महात्मने
नमो नमस्तेऽस्तु पुनर्नमोऽस्तु ॥५१८॥

नमस्तस्मै सदेकस्मै नमश्चिन्महसे मुहुः ।
यदेतद्विश्वरूपेण राजते गुरुराज ते ॥५२०॥

गुरुजींनी 'तत्त्वमसि' हा उपदेश केला व शिष्याला अहं ब्रह्मास्मि हा अनुभव आला. त्याने तो अत्यंत आनंदित झाला. अलौकिक अनुभूतीने भारावून गेला.

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |


Dreams are the pathways to all of our tomorrows

तो आनंद त्याच्या रोमारोमातून ओसंडतो आहे.
आर्किमिडिज- युरेका । क्रिकेट मॅच + इथे तर
ब्रह्मानंद- श्रेष्ठ पुरुषार्थ ! सदैव झोपडीत
राहणाऱ्या, मर्यादित विश्व असणाऱ्याला विशाल
प्रासाद मिळाल्यावर जी अवस्था होईल तसे इथे झाले आहे.
हा आनंद त्याच्या कल्पनेपलीकडचा आहे. 'यन्मनसा न
मनुते' या कोटीतला आहे. मात्र या आनंदाच्या जोडीला
थोडा संभ्रम सुद्धा आहे. जादूगाराने जादूने निर्माण केलेली
नगरी अचानक नाहीशी झाली की जे आश्चर्य वाटेल
तसे इथे झाले, त्यामुळे 'महदद्भुतम्' किंवा गीतेतील
'आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनं' असे शब्द वापरले आहेत.
'आनंद चहूंदिशी कोंदला' अशी अवस्था झाल्यामुळे सर्वत्र
एकत्वाचा अनुभव येतो आहे. वेगळेपणा सहज गेले आहे.
त्याज्य, ग्राह्य हा भेद नाहीसा झाला आहे. तो म्हणतो
मला काही दिसत नाही. काही ऐकू येत नाही.
स्वामी रामकृष्ण परमहंस — विवेकानंद - अनुभूति. त्यांची
मुक्त होण्याची तयारी नसल्याने ते घाबरले व ओरडू लागले
हे विश्व, हे शरीर सोडून मला कुठे नेत आहात? चैतन्य कुठे?
इथे मात्र तसे होत नाही. कारण शिष्याची तशी
पूर्वतयारी झाली आहे. त्यामुळे तो अस्वस्थ होत नाही. घाबरून
जात नाही, ओरडत नाही. उलट आनंदमय होऊन राहतो.
आणि असा अलौकिक आनंद मिळवून दिल्याबद्दल
गुरुंची स्तुती करतो. परंतु हे करताना गुरु हे दैविक
ब्रह्मस्वरूपच आहेत हेही त्याला जाणवते. अशा ब्रह्मरूप
गुरुराया तो वंदन करतो पुन्हा-पुन्हा वंदन करतो.
आत्मस्वरूप झालेला शिष्य स्वतःला पुराणक मानतो
पुर(शरीर) विषयीची आसक्ती नाहीशी झाली- नवद्वारे
पुर देही। पुरुष — पुरे शयति सः पुरुषः।

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

मी निर्विकल्प, निरवयव आहे असे वर्णन करताना त्यांनी काळाचा दृष्टांत दिला आहे. काळ अखंड (कालनिरसी) आहे, त्यात विभाग नाहीत. सोयीसाठी आपण दिवस, रात्र, महिना, वर्ष असे भेद कल्पतो. परंतु आरोपित वस्तुचे गुणदोष तिच्या आश्रयाला बाधक ठरत नाहीत. आणखी एक दृष्टांत मृगजळाचा दिला आहे.

मृगजळातील पाणी जसे वाळवंटातील जमीन भिजवत नाही तसेच विश्व आपल्या गुणदोषांनी ब्रह्माला लिप्त करत नाही. वस्तुतः मृगजळ हा भास आहे. तिथे वास्तवात पाणी नाहीच. तसेच विश्व हाच मोठा भास आहे.

मेघाचा जसा आकाशाशी संबंध नाही तसाच माझा देहाशी संबंध नाही. इथे आकाश म्हणजे केवळ पोकळी आहे. मेघाचे विविध रंग हे आकाशाला चिकटत नाहीत. देहाच्या अवस्था - जागृती, स्वप्न, सुषुप्ती या देखील मला चिकटत नाहीत.

देह म्हणजे केवळ उपाधि आहे. तो येते आणि जाते, तोच कर्मे करते व फळही भोगते. तोच जन्मते व मरते. आपण मात्र कुलपर्वताप्रमाणे निश्चल असतो. प्रलयकाळीही जे पर्वत अचल राहतात असे ७ श्रेष्ठ पर्वत आहेत.

असाच आणखी एक दृष्टांत - नाटकी वेषाने एखाद्याने कर्मे केली व नाटकात त्याची फळही भोगली. परंतु त्याने मूळ व्यक्तीला कोणताही लेप, कलंक नाही. मग तो दरोडेखोर असो, भिकारी असो किंवा राजा असो.

एकदा ब्रह्मानंदाची प्राप्ति झाली की तो पूर्ण होतो. पूर्ण घड्यामध्ये काहीही भरता येत नाही व गरजही नसते. काही कर्म करण्याचे कारणही उरत नाही. त्याला पापपुण्याची बाधाही होत नाही. तो सर्व दुःखाच्या पलीकडे जातो.

सावलीवर थंड पाणी ओतले की मी भिजलो असे वाटते. दुधासारखे काही सांडले तर मी चिकट झाल्यासारखे वाटते. परंतु त्याची ती सावली असते

November 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | | | | | | | | | | | |


Do not expect love and attention. Give it instead.

तो चिकट होत नाही. त्याचप्रमाणे देहाला बाधणारे शीतोष्णादि विकार आत्म्याला बाधत नाहीत. तो सर्वांपासून अलिप्त असतो.

तो सूर्यासारखा सर्वसाक्षी असतो. अग्निसारखा समदृष्टी असतो. जवळ येणाऱ्या प्रत्येकाला (चांगले-वाईट) जाळण्याचा त्याचा धर्म असतो.

व्यवहारात मात्र वाईट माणसाबरोबर चांगला माणूस सतत दिसू लागला तर, शंका येते. चांगल्यावर वाईटाचा आरोप केला जातो. तसेच इथे घडते. पाण्यात पडलेले सूर्याचे प्रतिबिंब, पाणी हलले की हलते. प्रत्यक्षात सूर्य हललेलाच नसतो. तो निष्क्रिय असतो. कर्तृत्व, भोक्तृत्व, जडत्व, दुर्जनत्व हे गुणधर्म बुद्धीचे विकार आहेत. यापैकी कोणतेही गुणधर्म आत्म्याला स्पर्श करू शकत नाहीत.

या सर्व कथनात अनुभवाची उत्कटता आहे. तैत्तिरीय उपनिषदातील भृगुवल्लीतील आत्मज्ञान झालेला मुमुक्षु हाऽऽवु, हाऽऽवु, अहमन्नम् अहमन्नम् असे अत्यंत आनंदाने म्हणतो. तसेच इथे आचार्यांचा ब्रह्मज्ञानी शिष्य धन्योऽहं, कृतकृत्योऽहम्, विमुक्तोऽहम्, असङ्गोऽहम् । असे उद्गार काढतो. या काही श्लोकातून आचार्य शिष्याची आनंदाची उत्कट अवस्था आपल्यासमोर मांडतात. तसेच त्या अनुभूतीचे मार्मिक विश्लेषणही करतात.

याआधी केलेला उपदेश कोऱ्या पाटीवर काढलेल्या मुळाक्षरांप्रमाणे होता. आणि आताचा उपदेश मात्र प्रज्ञानाचे प्रशिक्षण (Advanced Training) या स्वरूपाचा असणार आहे. तेच विचार कार्यस्वरूपी परिणाम साधणारे आहेत. काही नवीन तर काही उजळणी स्वरूपाचे आहेत.

www.madhaveeraghuveer.com

गुरुंचा पुन्हा एकदा उपदेश - ५२१ ते ५३५

Notes

## Advance Training . P.G./Phd.

प्राथमिक शिक्षण घेणारा आणि पदव्युत्तर शिक्षण घेणारा यात फरक असणारच. पूर्वी साधकपदाच्या मार्गावर चालणाऱ्यांसाठी केलेला उपदेश स्थूल स्वरूपाचा होता. आता मात्र पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. आता गुरुंच्या बोधकशैलीमध्ये तसेच शिष्याच्या ग्रहणक्षमतेमध्ये पुष्कळ अंतर आहे. शिष्य आता अंतिम कक्षापर्यंत पोहोचला आहे परंतु तरीही अत्यंत विनयशील / नतमस्तक आहे. त्याला सर्वत्र ब्रह्माचीच अनुभूति येत आहे. गुरुजी हे जाणतात.

५२२ ते म्हणतात :- तू सर्व अवस्थांमध्ये (जागृती, स्वप्न, सुषुप्ती) शांतमनाने व अध्यात्मदृष्टीनेच पाहा. ब्रह्म जाणणाऱ्या सज्जनांच्या बुद्धीला ब्रह्माशिवाय अन्य काहीच दिसत नाही. सर्वत्र ब्रह्माचाच अनुभव येतो. एकदा स्वर्गीय सूर ऐकले की गाढवाचे रेकणे जसे सुखद वाटणार नाही. ~~एकदा~~

५२३ आकाशात आल्हाददायक चंद्र विराजमान असताना चित्रातला कृत्रिम चंद्र जसा आनंद देऊ शकत नाही तसे ब्रह्मतत्त्व जाणल्यानंतर, त्याची यथार्थ अनुभूति घेतल्यानंतर कोरडा शास्त्रार्थ, शब्द नखचर्चा करण्यात आनंद वाटणार नाही. भगवद्गीता --- यावानर्थ उदपाने

तिन्ही अवस्थांमध्ये ब्रह्मानंद टिकून राहतो.

जागत राम, सोवत राम, सपनेमें देखूं आत्माराम।

Eat Cricket, Drink Cricket, Sleep Cricket.

त्याची चित्तवृत्ती पूर्णपणे ब्रह्माकारी (एकाग्र) झालेली आहे त्याला चिंतनाला अन्य विषय असणे शक्य तरी आहे का?

५२४. असत् पदार्थांचा अनुभव दुःखदायकच असतो. त्याने मिळणारी तृप्ती टिकत नाही. एखादी वस्तू मिळाली की पुन्हा तिच्या प्राप्तीची इच्छा न होणे, कायमची इच्छापूर्ति होणे ही खरी तृप्ती! अशी तृप्ती केवळ ब्रह्मानंदानेच प्राप्त होते त्याने दुःखाची कायमची निवृत्ती होते.

५२६ नेहमीचा रज्जु सर्प / शुक्ति रजत दृष्टांत न देता आचार्य आता आकाशात नगरीची कल्पना हा भास आहे हे स्पष्ट करतात.

प्राणो हि एष: य: सर्वभूतैर्विभाति ।
विजानन् विद्वान् भवते नातिवादी ॥ मुण्डक ३.१.४
मौन

ACTION PLAN — DECEMBER '16

त्याप्रमाणे ब्रह्मावर होणारा विश्वाचा भास हाही मिथ्याच आहे. ब्रह्मस्वरूपात सदैव राहून तू शांति मिळव आणि मौन हो. ज्ञानी असतो तोच मौन राहू शकतो. मौनाची व्याख्या — (पृ २७)

असत् कल्पना, विकल्प यांचे कारण असल्याने मनाची शांती म्हणजे मौन! ब्रह्मज्ञानी मनुष्य निरंतर, ब्रह्मानंद, सुख भोगत असतो. मनाची शांती म्हणजे संकल्प-विकल्प नाहीसे होणे. पृ २८ - ~~[illegible]~~ आकारमौन, काष्ठमौन, निर्वासनमौन.

मनातून वासना पूर्णपणे निघून गेल्यावर कोणतीही प्रतिक्रिया सुद्धा उठत नाही. No reaction is मौन. या मौनाला आचार्य आत्यंतिक सुखाची अवस्था मानतात. ब्रह्मानंद प्राप्त झालेली व्यक्ती मौनातील सुखाचा अनुभव घेते. अनुपम शांती अनुभवते.

नास्ति निर्वासनान्मौनात्परं सुखकृदुत्तमम् ।
विज्ञातात्म स्वरूपस्य स्वानन्दरसपायिनः ॥ पृ २८॥

(पृ २९) बाह्य क्रिया चालू असताना आंतरिक होणे परंतु अवघड असले तरी एकदा आत्मज्ञान झाले की या सर्व क्रिया करत असूनसुद्धा ब्रह्मानंद हवा तेव्हा, हवा तेवढा मिळवता येतो. लोक महाराज — शिष्य. जेव्हा तू आठवण करशील तेव्हा ही ब्रह्मानंद मिळू शकेल [illegible] विसाव्याचा [illegible]. जिथे पाहिजे तिथे बसावे. निश्चित शंकराचार्यांच्या दृष्टीने देश, काळ, दिशा यांचे बंधन नाही. प्राथमिक अवस्थेत यम-नियम पाळावे लागतात. परंतु पुढे ज्याचे मन संकल्प विकल्प रहित झाले आहे त्याला कोणतेच बंधन लागू होत नाहीत. आपले स्वरूप जाणून घ्यायला इतर प्रमाणाची आवश्यकता नाही. डोळे निर्दोष असले तर घटाचे यथार्थ ज्ञान होईल. मग आत्मस्वरूप हे तर नित्यसिद्ध आहे. त्याला देश, काळ, शुद्धी यांची अपेक्षा नसते.

OBJECTIVES THIS MONTH

DATE | DESCRIPTION | REMARKS

NOVEMBER '16: M T W T F S S M T W T F S S — 1 2 3 4 5 6 7 8 9 10 11 12 13 / 14 15 16 17 18 19 20 21 22 23 24 25 26 27 / 28 29 30

2016

JANUARY '17: M T W T F S S M T W T F S S — 1 2 3 4 5 6 7 8 / 9 10 11 12 13 14 15 16 17 18 19 20 21 22 / 23 24 25 26 27 28 29 30 31

DEC

देवदत्तोऽहमित्येतद् विज्ञानं निरपेक्षकम्।
तद्वद् ब्रह्मविदोऽप्यस्य ब्रह्माहमिति वेदनम्॥ ५३॥
भानुनेव जगत्सर्वं भासते ह्यस्य तेजसा।
अनात्मकम् असत्तुच्छं किं नु तस्यावभासकम्॥ ५४॥

भारतातील देवदत्त परदेशात गेला, वसंत ऋतु सरून शिशिर ऋतु सुरु झाला तरी तो देवदत्त आहे या ज्ञानाला बाधा येत नाही. याज्ञदत्त, विशारदत्त होत नाही. 'देवदत्त' आहे या ज्ञानाला देशकालादिची अपेक्षा नाही. तर मग 'मी ब्रह्म आहे' या ज्ञानाला कसे काय देशकालाचे बंधन असणार? तसेच ब्रह्मरूप झालेल्याला देखील कशाचेच बंधन नाही. हा अनुभव स्वतःप्रमाण, स्वतःसिद्ध आहे.

न तत्र सूर्यो भाति न चन्द्रतारकं
नेमा विद्युतो भान्ति कुतोऽयमग्निः।

सर्व वेद, शास्त्रे, उपनिषद ग्रंथ पुराणे या सर्वांचा आधार परब्रह्मच आहे अशा सर्वप्रकाशक परमात्म्याला कुणी निर्माता नाही. अशा नियामकाला कोण नियमित करणार?

रविचंद्राचा तू निर्माता। शरण तुला भगवंता।



www.madhavaraghuveer.com

# - ब्रह्मज्ञान्याचे आचरण -

६.१२.२०१७

५३८ ते ५५६



चिन्ताशून्यमदैन्यभैक्षमशनं पानं सरिद्वारिषु
स्वातन्त्र्येण निरङ्कुशा स्थितिरभीर्निद्रा श्मशाने वने।
वस्त्रं क्षालनशोषणादिरहितं दिग्वास्तु शय्या मही
संचारो निगमान्तवीथिषु विदां क्रीडा परे ब्रह्मणि ॥५३८॥

चिंता आणि दैन्य ज्यात नाही असे भिक्षान्न हेच ज्ञानी लोकांचे भोजन आहे, नद्यांचे पाणी हेच पेय आहे, स्वातंत्र्यामुळे त्यांना निरंकुश अवस्था प्राप्त झालेली असते. निर्भय असणाऱ्या त्यांना स्मशानात वा वनात निद्रा लागते. धुणे, वाळवणे इ० क्रियांची आवश्यकता नसलेले दिशा हेच त्यांचे वस्त्र, पृथ्वी हीच शय्या, वेदांतमार्गावर त्यांचा संचार आणि परब्रह्माशी क्रीडा असते.

करतल भिक्षा तरुतल वास: ---

सुषुप्ति वनामाजि निजुनि जावे ---

अहिनिर्ल्वयनीवायं मुक्तदेहस्तु तिष्ठति
इतस्ततश्चाल्यमानो यत्किंचित्प्राणवायुना ॥५५०॥
स्रोतसा नीयते दारु यथा निम्नोन्नतस्थलम्।
दैवेन नीयते देहो यथा कालोपभुक्तिषु ॥५५१॥

सापाने टाकलेल्या कातीप्रमाणे याचा देह प्राणवायुमुळे इतस्तत: वावरत राहतो. किंवा लाकूड जसे प्रवाहाकडून खाली / वर नेले जाते, तसा दैवाकडून त्याचा देह नेला जातो.

जीवन्नेव सदा मुक्तः कृतार्थो ब्रह्मवित्तमः।
तथैव ब्रह्मविच्छ्रेष्ठः सदा ब्रह्मैव नापरः ॥५५५॥
शैलूषो वेषसद्भावाभावयोश्च यथा पुमान् ॥५५६॥

उपाधिचा नाश झाल्यावर तो सद्रूप, अद्वय असा ब्रह्मरूपच होतो. ज्याप्रमाणे नट वेष असला किंवा नसला तरी पुरुषच असतो. त्याप्रमाणे श्रेष्ठ ब्रह्मज्ञानी हा सदैव ब्रह्मच असतो. अन्य कोणीही (नाना, बाबा, साहेब, गणपतराव, आण्णा) नसतो.

www.madhaveeraghuveer.com

एखादे [लहान मूल] जसे लहान-भूक, शरीराला होणारी इजा या सगळ्या गोष्टींचे भान हरपून खेळत रमते तसाच हा ब्रह्मज्ञानी निर्मम, निरहंकार होऊन ब्रह्मतत्त्वात रमतो. इथे (५३८) ब्रह्मतत्त्व या अर्थाने वस्तुनि हा शब्द आला आहे.

निजवस्तु दाविली माझी मन | सद्गुरुरायें बहु कृपा केली ||

गजानन महाराज —— बंकटलाल, कृष्णाजी पाटील - लपण शेतकरी, कधी मंदिरात, कधी ओहोळाचे पाणी पीत. कधी वणवण भटकत. कारण ब्रह्मज्ञानी स्वतंत्र असतो. त्याच्या गरजा अतिसामान्य असतात. आपण विशेष आहोत असे तो दाखवत नाही —— अमानित्व, चातुर्य लपवी, महत्त्व हरवी पिसेपण मिरवी आवडीने ||

असा हा ब्रह्मज्ञानी शरीररूपी यानाचा आश्रय घेऊन राहतो, निरासक्त मनाने सर्व क्रिया करतो —— [ब्रह्मपिसा]

आत्मसंतुष्ट —— एकट्याने वावरतो - कोणतेही रूप धारण करतो.

तैत्तिरीय उपनिषद —— पंचकोश ओलांडून पलीकडे जातो

कधी ब्रह्मज्ञानी तर कधी जडमूढ

विद्वान तर कधी भ्रमिष्ट

राजवैभवाने युक्त तर कधी भणंग

सौम्य व्यक्तिमत्व " " अजगरासारखा निष्क्रिय.

आपले सामर्थ्य कुणालाही कळू देत नाही. [विरोधाभास]

किरकोळ अशक्त, दुबळा - तरीही - ब्रह्मांड भेदण्याचे सामर्थ्य

कपर्दिकही हातात नसताना सदैव संतुष्ट

उपभोगाशिवाय तृप्ती अनुभवतो. कधी कधी विचित्र, विक्षिप्त, परंतु त्यातून [समदर्शित्व] दिसून येते. नामदेव कुत्र्याच्या मागे तुपाची वाटी घेऊन पळत होते.

ब्रह्मज्ञानी - कर्मे करत असताना त्याचे मन त्यात आसक्त नसल्यामुळे तो करून अकर्ता ठरतो. — सूर्य —

[श्रेष्ठ कर्मयोगी] कर्म केल्यावर भोगही भोगावे लागतात परंतु हे भोगही तो निरासक्त मनाने भोगतो

www.madhaveeraghuveer.com

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |


If there is no struggle, there is no progress.

म्हणून तो भोगून अभोक्ता असतो. तो नित्य आत्मस्वरूपात स्थित असतो. देहाच्या मर्यादेत राहूनसुद्धा तो व्यापक होतो — जणू आकाशाएवढा!

**निर्द्वंद्व** जिथे द्वैत असते, तिथे द्वंद्व येते, पण ब्रह्मज्ञानी तर अद्वैत ब्रह्मस्वरूप झालेला असतो. त्यामुळे त्याला प्रिय-अप्रिय, शुभ-अशुभ असा भेद उरतच नाही.

जेथे नाही दुसरी परी। क्रोध यावा कुणावरी।

जोपर्यंत स्थूल, सूक्ष्म देहाविषयी अहंभाव असतो, तोपर्यंत द्वंद्वे त्रास देतात. अहंकार गेल्यावर नाही.

**विदेही** ब्रह्मज्ञानी माणूस विदेहीच असला तरी लोक अज्ञानामुळे त्याला देहधारी समजतात.

खगोलशास्त्रीय दृष्टांत — ग्रहणकाळात राहू-केतू सूर्याला गिळतात असे लोक म्हणतात. परंतु खरे तसे नसते. सूर्य व पृथ्वी यांच्यामध्ये चंद्र आल्याने सूर्य काही काळ दिसेनासा होतो. केतु सूर्याला ग्रासतो ही कल्पना जाणकाराला हास्यास्पद वाटते. तसेच देहाच्या उपाधीतून तो मुक्त झाला आहे अशा ब्रह्मज्ञानी माणसाचा देह दिसतो, वावरतो, क्रिया करतो म्हणून असे लोक त्याला देहधारी समजतात — अज्ञानाने मां मूढ — — — — — सापाच्या कातीप्रमाणे तो इतस्ततः फिरत असतो, किंवा लाकडाचा ओंडका नदीच्या प्रवाहाबरोबर वाहत जातो, तसा हा ब्रह्मज्ञानी प्रारब्धकर्म भोगत असतो.

मात्र ज्ञानाने त्याने दृश्य विश्वाचा विकल्प नाहीसा केलेला असतो, तो उद्दिष्ट व अनुद्दिष्टांच्या पलीकडे जातो. **लक्ष्यालक्ष्य गतिं त्यक्त्वा** — आता त्याला मिळवायचे काही उरत नाही. काही वेळा निर्गुण ब्रह्म हे लक्ष्य आणि सगुण ब्रह्म हे अलक्ष्य असे मानले जाते. मात्र आता तो त्यापलीकडे गेलेला असतो. निर्गुणाची प्राप्ती त्याला झालेली आहे. मिळवण्याजोगे जे होते ते मिळाले आहे.

January 2017

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

२० नोव्हेंबर २०१६

MONDAY
DEC '16
5
340-026 WK-49

असा ब्रह्मज्ञानी हा शिवस्वरूपच होऊन जातो. देव पहायासी गेलो देव होऊनिया ठेलो असी त्याची अवस्था होऊन जाते.

सदेह असतानाही हा ब्रह्मज्ञानी मुक्त असतो, कृतार्थ असतो. परंतु देहाची उपाधि नष्ट झाली की तो अद्वितीय, एकमेव असे ब्रह्मच होऊन जातो.

त्याप्रमाणे नटाने कोणतीही भूमिका (राजा/भिकारी स्त्री/दासी) घेतली तरी मुळात तो वेगळाच असतो. त्याचे भान त्याला असते. त्याचप्रमाणे ब्रह्मज्ञानी हा कोणताही वेष असला तरी तो नित्य, शाश्वत ब्रह्मच असतो. ब्रह्मज्ञानी मनुष्य देह असला किंवा नसला तरी ब्रह्मच असतो. हेच आचार्यांना त्यातून सुचवायचे आहे.

ब्रह्मज्ञानी हा जीवन्मुक्तच असतो. देहपातानंतर तो पूर्णब्रह्म होतो.

## ३८ देहपात - ५५६ ते ५६३

यत्र क्वापि विशीर्णं पर्णमिव तरोर्वपुः पतनात् ।
ब्रह्मीभूतस्य यतेः प्रागेव हि तच्चिदग्निना दग्धम् ॥५५६॥

ब्रह्मरूप झालेल्या यतीचा देह विशीर्ण होणाऱ्या वृक्षाच्या पानाप्रमाणे कुठेही पडला तरी (बिघडत नाही) तो आधीच ज्ञानरूपी अग्निने दग्ध झालेला असतो.

झाडाचे पिकलेले पान जसे सहज गळून पडते भिरभिरत कुठेही जाते, नष्ट होते तसा ब्रह्मज्ञान्याचा देह कुठेही पडला तरी त्याला त्याचे काही वाटत नाही. चिंता नाही.

ब्रह्मज्ञान झाल्यामुळे अज्ञान, माया नष्ट होते. त्यामुळे ममत्व देहभाव ही गळून जातो. देहपातानंतर होणारा दाहसंस्कार आधीच होऊन गेलेला असतो. ज्ञानाला अग्नीची उपमा अनेकदा दिली आहे. यथैधांसि समिद्धोऽग्निः । ज्ञानाग्निः दग्धकर्माणं
मेल्यावर कोणी अग्नि देत नाही. हा विचार व्यापक अर्थाने घ्यायचा.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |


I take it as a man's duty to restrain himself.

www.madhuraveeraghuveer.com

५५८- पूर्ण, आनंदरूप, अव्यय आत्मरूपाने सदैव स्थित असणाऱ्या मुनीला त्वचा, मांस, विष्ठा इ० नी युक्त अशा देहाच्या विसर्जनासाठी योग्य देशकालाची प्रतीक्षा करावी लागत नाही. श्रीपाद-उत्तरायण हा अपवाद। देह ही एक निंद्य उपाधीच आहे. आणि त्याला हवी असणारी मुक्ति आधीच मिळालेली असते. आता उरते ते केवळ टाकाऊ वस्तु टाकून देण्याचे काम। त्याला काळ वेळ देश, परिस्थितीची काय आवश्यकता?

५५९ कारण शेवटी देहपात म्हणजे मोक्ष नव्हे किंवा दंड, कमंडलुचा त्याग म्हणजे मोक्ष नव्हे तर अविद्यारूपी ग्रंथितून सुटका म्हणजे मोक्ष आहे.

मोक्ष हे सर्वश्रेष्ठ ध्येय आहे आणि ते वरवरच्या वस्तूंच्या त्यागाने साधत नाही. नाहीतर सर्वच मर्त्य प्राणी देहत्यागानंतर मोक्षाला गेले असते. ब्रह्मज्ञानी व्यक्तीच्या दृष्टीने देहपाताहून महत्त्वाचा आहे तो अज्ञानाचा नाश। उपनिषदातील शब्द- अज्ञानग्रंथिचा नाश:
भिद्यते हृदयग्रंथिः छिद्यन्ते सर्वसंशयाः।

५६० कुल्यायामथ नद्यां वा शिवक्षेत्रेऽपि चत्वरे।
पर्णं पतितं चेत्तेन तरोः किं नु शुभाशुभम्॥५६०॥

वृक्षाचे पान ओहोळात पडले काय, नदीत पडले काय, तीर्थक्षेत्री पडले काय किंवा चव्हाट्यावर पडले काय, त्यामुळे वृक्षाचे काय बरे-वाईट होणार?
वृक्षापासून तुटल्यावर ते पान कुठेही पडले तरी त्याचा दोष वृक्षाला लागणार नाही. तसेच ब्रह्मज्ञानी व्यक्तीचे देहावरील ममत्व सुटले की देहाची अवस्था काहीही झाली तरी त्याविषयी त्याला काहीही वाटत नाही. त्रास होत नाही.

५६१ पाने, फळे, फुले इ० यांचा नाशाप्रमाणे देह, इंद्रिये प्राण व बुद्धी यांचा नाश होतो. सदानंदरूप आत्म्याचा नाही. हा वृक्षाप्रमाणे नित्य असतो.

www.madhaveeraghuveer.com

आत्म्याचे नित्यत्व व उपाधीचे विनाशित्व आचार्य स्पष्ट करतात. घट नाहीसा झाला तरी आकाश नाहीसे होत नाही. ते असतेच.
गीता - समं सर्वेषु भूतेषु
सर्वभूतेषु येनैकं ....

५६२, ५६३ - या श्लोकांच्या द्वारे आचार्य श्रुतिवचनांच्या आधारे प्रतिपादन करतात.

याज्ञवल्क्य - मैत्रेयी संवादातील ही वचने येतात बृहदारण्यक - ४.५.६. आत्मा देहाच्या उपाधीत असताना देह नष्ट झाला तरी त्याबरोबर आत्मा नाहीसा होत नाही. आत्मा निरुपाधिक होतो इतकेच.

याज्ञवल्क्य मैत्रेयीला सांगतात. अग हा आत्मा अविनाशी आहे, अविकारी आहे शिवाय ते अविकारित्व विकारी वस्तूहून वेगळे आहे.

प्रज्ञानघन इति सत्यसूचकं आत्मलक्षणम् अनूद्य औपाधिकस्य एव विनाशम् कथयन्ति।

प्रज्ञानघन इति सत्यसूचकम् अशा शब्दात आत्मस्वरूपाचे यथार्थ वर्णन करून (उपाधिरूपी देहाचा नाश झाल्यावर) तो धारण करणाऱ्यांचा नाश झाला असे म्हणतात. प्रज्ञान घन म्हणजे ज्यात दुसरे काहीच नाही अशी जाणीवतत्त्वाची एकजिनसी राशच आहे.

कानड्याच्या पिशवीत बांधलेले हाडा मासाचे आणि विष्ठेचे गाठोडे कोणत्या वेळी व कोठे टाकावे असा प्रश्न त्याला पडत नाही. किंवा ते टाकून देताना कोणास साक्षी ठेवावे असे ही कारण नाही. खरे तर जेव्हा तुमच्याकडे कोणी पाहत नसेल तेव्हाच ती घाणेरडी वस्तु टाकून देणे योग्य आहे.

विवेकचूडामणि - श्लोक - ५५० - जसे पाणी स्थिर पाणी-घटाच्या गुणधर्मांनी [illegible]काश काही भिन्न होत नाही.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |


Friendships are discovered rather than made.

# ३९. ब्रह्मभावप्राप्ति ५६४ ते ५८१

पाषाणवृक्षतृणधान्यकटाम्बराद्या
दग्धा भवन्ति हि मृदेव यथा तथैव
देहेन्द्रियासुमन आदि समस्तदृश्यं
ज्ञानाग्निदग्धमुपयाति परात्मभावम् ॥५६४॥

पाषाण, वृक्ष, तृण, धान्य, शव, वस्त्र इ० गोष्टी जळून त्या जशा मातीरुपच होतात, तसेच देह, इंद्रिय, शुद्धमन इ० सर्व दृश्यविश्व ज्ञानाग्नीत जळून परब्रह्मरुप होते. सर्व भौतिक पदार्थ जळले की त्यांची राख होते म्हणजेच माती होते. कारण ते सर्व मातीतूनच उत्पन्न झाले आहेत. मातीचेच विकार आहेत. तसेच प्रकाशरुप आत्मज्ञान झाले की त्या प्रकाशरुपात देहादी उपाधि पार विलीन होतात. उरतो तो केवळ ब्रह्मभाव। — थेंबुटा सागरी मिळाला.

म्हणजेच हे विश्व जे वेगळेपणाने भासत होते ते त्या ब्रह्मात विलीन होते. कार्य हे नेहमीच कारणात विलीन होते. त्याचे वेगळेपण संपते. ज्ञानाला नेहमीच अग्नीची उपमा दिली जाते. ज्ञानाग्नि दग्धकर्माणं भस्मसात्कुरुते।

५६५. सूर्य उगवला की त्याहून भिन्न असलेला अंधार जसा उरत नाही तसेच असत्‌रुप विश्व सत मध्ये ब्रह्मात लोप पावते. या सर्वांचा मागोवा घेतला तर आत्मतत्वाखेरीज काहीच नाही असे अनुभवाला येते. नामरुपाने नटलेले हे विश्व आत्मानुभूतीच्या अग्नीमध्ये जळून खाक होते. या विलक्षण नंतर जगाचा आत्मतत्वात होणारा विलय ही एक विलक्षण अनुभूति आहे. त्याचे स्पष्टीकरण करता येत नाही. ती स्वसंवेद्य आहे. यतः वाचो निवर्तन्ते अप्राप्य मनसा सह। कारण तिथे नामरुप नाही त्याची कल्पनाच करता येत नाही. कारण हे वैविध्यपूर्ण जग शुद्ध जाणिवतत्वाच्या अवस्थेत विलीन पावते.

५६६. घटे नष्टे तथा व्योम — घट फुटला की घटाने मर्यादित झालेले आकाश महदाकाश होते. घटाची उपाधी नाहिशी होते.

January 2017

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |

विशेष सामान्यात विलीन होते. सविशेष ब्रह्म निर्विशेषात विलीन होते. सोपाधिक – निरुपाधिक ब्रह्म हे अतिसामान्य आहे. तिथे पोहोचण्यासाठी आपण पांघरलेल्या झुली उतरवून ठेवायला हव्यात. रुपाची, संपत्तीची, विद्वत्तेची, सत्तेची आवरणे, पांघरुणे खऱ्या 'मी' ला झाकून टाकतात.

सविशेष 'मी' चे निर्विशेष 'मी' त विसर्जन करणे हीच साधना आहे. सविशेष मी हा देहाला धरुन असतो. मी हे केले, मी ते केले ही खऱ्या मी ची नांदी असते. परंतु मी म्हणजे आत्मा, मी म्हणजे ब्रह्म हे एकदा मनात ठसले की लक्षात येते ब्रह्म म्हणजे निर्विशेष आहे ते काहीच करत नाही. मी जर ब्रह्म हे कळले तर सविशेष मीच्या अभिमान कशाला बाळगायचा! संतांनी गंथे म्हणतात

बाला तरुणा जराजर्जरा उरेल नाही ब्रह्मविचारा।
कैसे समजावे तुज मतिमंदा भज गोविंदा भज गोविंदा॥

५६८. क्षीरं क्षीरे यथा क्षिप्तं तैलं तैले जलं जले।
संयुक्तमेकतां याति तथात्मन्यात्मविन्मुनिः॥५६८॥

आत्मज्ञानी मुनी आत्म्याशी संयोग होऊन एकरुप होतो.

मुळात जीव आत्मस्वरुप आहे. अज्ञानामुळे त्या स्वरुपावर आवरण पडले आहे. ते दूर झाले की आत्मा हेच खरे स्वरुप आहे हे लक्षात येते व तो तदाकार होतो यात नवल काहीच नाही. ही सहज प्रक्रिया आहे.

निरुपाधिक ब्रह्मात मिसळून जाणे म्हणजेच विदेहमुक्ती आहे. अशी मुक्ती मिळाल्यावर पुन्हा परतत नाही. यद्गत्वा.... तो जीवन जगत असतानाच मुक्त होऊन जातो.

श्वास संपले आणि वासना शिल्लक राहणे हा मृत्यु.

श्वास शिल्लक आहेत वासना संपून जाणे हा मोक्ष.

प्रगाढ मननाच्या किंवा ध्यानावस्थेमध्ये शरीर मन बुद्धी यांच्या पलीकडची अवस्था प्राप्त होते तेव्हा जीव आत्मतत्वामध्ये विलीन होतो. त्याला आत्मसाक्षात्कार होतो.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |



Each of us is one of life's brightest spirits.

www.madhaveelagnuveer.com

एवं विदेह कैवल्यं सन्मात्रत्वमखण्डितः।
ब्रह्मभावं प्रपद्यैष यतिर्नावर्तते पुनः॥५६५॥
सदात्मैकत्वविज्ञानदग्धाविद्यादिवर्ष्मणः।
अमुष्य ब्रह्मभूतत्वाद् ब्रह्मणः कुत उद्भवः॥५६६॥

अशा प्रकारे अखंड स्वस्वरूपात राहणे म्हणजे विदेहमुक्ती होय. हा भाव प्राप्त झाला की यती पुन्हा संसारचक्रात परतत नाही.

ब्रह्मात्मैक्यत्वज्ञानाने अविद्यादि शरीरांचा नाश झाल्यावर त्याच्या ब्रह्मरूप होण्यामुळे ब्रह्मज्ञानी माणसाला जन्म कुठून?

January 2017

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

आवृतेः सदसत्वाभ्यां वक्तव्ये बन्धमोक्षणे
नावृतिर्ब्रह्मणः काचिदन्याभावादनावृतम्।
यद्यस्त्यद्वैतहानिः स्यात् द्वैतं न सहते श्रुतिः॥
५७०॥

आवरणाचे असणे वा नसणे यालाच बंध व मोक्ष म्हटले जाते. आणि एका ब्रह्माशिवाय दुसरे काहीच नसल्याने ब्रह्माला आवरण नाही, ते अनावृत आहे. आवरणामुळे अद्वैताचा नाश होतो आणि द्वैत तर श्रुतीला मान्य नाही.

एखाद्या गोष्टीवर आवरण पडणे म्हणजे त्या गोष्टीचे मूळ स्वरूप झाकले जाणे म्हणजेच बंध आहे. आणि एखाद्या गोष्टीवरील आवरण दूर होणे किंवा आवरणच नसणे म्हणजे मुक्ती आहे.

झाकणे ही क्रिया एकट्याने होत नाही. झाकणारा आणि जिला झाकले जाते अशा किमान दोन गोष्टी तरी तिथे असायला हव्यात. परंतु या सृष्टीत ब्रह्माशिवाय दुसरे काहीच नाही. सर्वं खल्विदं ब्रह्म। असे जर असेल तर ते कुणाकडून झाकले जाईल? आणि श्रुतींना तर अद्वैताला बाध आलेला चालतच नाही. द्वैताची कल्पना मान्य होत नाही.

कठोपनिषद सांगते - नेह नानास्ति किंचन।

छांदोग्य - इदमग्र आसीद एकमेवाद्वितीयं।

ब्रह्म हे एकच आहे. अद्वितीय आहे. त्यात उपाधीचा अगदी अल्प अंश जरी असेल तर ते विनाशी ठरेल. आणि अनंताला तर अंश नसतातच. ब्रह्म हे अक्षय आहे. आत्मतत्त्वाच्या दृष्टीने पाहिल्यास तिथे अनात्म नसतेच.

www.madhaveeragnuveer.com

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

बन्धं च मोक्षं च मृषैव मूढा
बुद्धेर्गुणं वस्तुनि कल्पयन्ति ।
दृगावृतिं मेघकृतां यथा रवौ
यतोऽव्ययाऽसङ्गचिदेतदक्षरम् ॥५७२॥

वास्तविक बंध आणि मोक्ष हे बुद्धीचे गुण आहेत परंतु अज्ञलोक व्यर्थच परब्रह्माठायी ते आरोपित करतात. जसे मेघाने दृष्टीवर आवरण घातले की सूर्यावर आवरण पडल्यासारखे वाटते तसेच हे आहे. कारण परब्रह्म हे अद्वितीय, असंग, चिद्रूप आणि एकमेव अविनाशी तत्त्व आहे.

आपण आपल्या डोळ्यावर हात ठेवून जगात अंधार आहे असे म्हणण्याप्रमाणे ही भ्रांति आहे. आपली दृष्टी ढगामुळे आवृत होते आणि काही वेळाने आपण म्हणतो "सूर्य पुन्हा बाहेर आला!" वस्तुतः सूर्य येतही नाही वा जातही नाही तो तिथे असतोच. तसेच अद्वय, असंग, परिपूर्ण ब्रह्म 'जीव' कसे होईल?

अस्तीति प्रत्ययो यश्च यश्च नास्तीति वस्तुनि ।
बुद्धेरेव गुणावेतौ न तु नित्यस्य वस्तुनः ॥५७३॥

ब्रह्मतत्त्वाच्या बाबतीत बंध आहे वा बंध नाही हे बुद्धीचे गुण आहेत. नित्यवस्तूचे नाहीत. ते निर्दोष आत्म्याला लागत नाहीत. निर्विकल्प, निष्क्रिय अशा ब्रह्माच्या ठिकाणी कल्पनेला वाव नाही, कारण कल्पना हे मनाचे कार्य आहे. आणि ब्रह्मरूप होणे म्हणजे मनाचे अमन होणे आहे. इथे नाशनाही व उत्पत्तिही नाही (५७५) बंध नाही वा साधकही नाही. मुमुक्षु नाही, वा मुक्तिही नाही. हे सारे भेद द्वैताचे द्योतक आहेत. खरे आहे ते केवळ अद्वैत ब्रह्मतत्त्व! बाकी सारे मिथ्या क्षणभंगुर आहे

January 2017

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 |
| 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | |



www.madhaveeraghuveer.com

सकलनिगमचूडास्वान्तसिद्धान्तगुह्यं
परमिदमतिगुह्यं दर्शितं ते मयाद्य।
अपगतकलिदोषः कामनिर्मुक्तबुद्धिः
स्वदतुलमसकृत्त्वं भावयेदं मुमुक्षुः ॥५७६॥

कलीचे दोष नाहीसे झालेल्या, वासनांपासून ज्याचे मन अलिप्त झाले आहे अशा तुला सर्व वेदशास्त्रांच्या शिरोभागी असणारे वेदान्ताच्या अंतरीचे गुह्य, अत्यंत गुप्त अतुलनीय आणि श्रेष्ठ असे रहस्य मी आज वारंवार (उलगडून) दाखवले आहे. हे मुमुक्षो, तू ते आत्मसात कर.

इथे कलीचे दोष म्हणजे षड्विकार आहेत. त्यातही दंभ, लोभ, मत्सर ही कलीची वैशिष्ट्ये आहेत.

या ग्रंथात आचार्यांचा प्रांजळपणा प्रकर्षाने जाणवतो. यात सर्वश्रेष्ठ ज्ञान सांगूनसुद्धा अंतरीचे गुह्य प्रकट करून सुद्धा सर्व श्रेय उपनिषदांना देतात. आपण काहीतरी नवीन, वेगळे केल्याचा अहंभाव यात नाही. यात उद्धृत केलेले वचन उपनिषदातीलच आहेत. 'आपले ज्ञान टिकून राहावे या इच्छेने गुरूने शिष्याला सर्व ज्ञान दिले आहे हा भाव यातून व्यक्त होतो.

वेदांतातील सर्व तत्त्वज्ञान विचारांचा चूडामणि, उपनिषद वाङ्मयाचे सखोल तात्पर्य, अत्यंत गुह्य असे ज्ञान मी तुला दिले. आता तू वासनादोषांपासून तुझे अंतःकरण शुद्ध करावे आणि तुझी बुद्धि कामनारहित करावी.

इति श्रुत्वा गुरोर्वाक्यं प्रश्रयेण कृतानतिः।
स तेन समनुज्ञातो ययौ निर्मुक्तबन्धनः॥५७७॥

गुरूंचे हे वचन ऐकून, विनम्रभावाने नतमस्तक होऊन त्यांच्याकडून आज्ञा घेऊन बंधमुक्त झालेला तो शिष्य निघून गेला.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |

गुरुरेष सदानन्दसिन्धौ निमग्नमानसः।
पावयन्वसुधां सर्वां विचचार निरन्तरः॥५७८॥

छात्र जेव्हा निघून गेला तेव्हा सद्गुरु निवांत टेकून गप्प राहिले नाहीत. स्वानंद सिंधुमध्ये ओलेचिंब झालेल्या मनाने सर्व जगावर अनुग्रह करीत सद्गुरुसुद्धा संचार करीत राहिले आणि जे साधक त्यांच्याकडे येत त्यांचे उद्बोधन / मार्गदर्शन करीत राहिले

इत्याचार्यस्य शिष्यस्य संवादेनात्मलक्षणम्।
निरूपितं मुमुक्षूणां सुखबोधोपपत्तये॥५७९॥

अशा प्रकारे आचार्य आणि शिष्य यांच्या संवादातून मुमुक्षुंना सहज ज्ञान प्राप्ति व्हावी म्हणून आत्मतत्त्वाचे निरूपण केले.

अनुबंध चतुष्टय - अधिकारी, विषय, प्रयोजन, संबंध
अधिकारी - मुमुक्षु - मोक्षाची इच्छा करणारा
विषय - आत्मज्ञान
प्रयोजन - सहजपणे ज्ञानप्राप्ति
संबंध - निरूप्य - निरूपक

अगदी मंदबुद्धीच्या साधकालाही सहज समजेल अशा सुयोग्य भाषेत आणि शैलीत वेदांतातील सिद्धांताची तर्कशुद्ध मांडणी या ग्रंथात केली आहे.

यातून आत्मतत्त्वाचे सत्यस्वरूप साधकाकडे उत्कृष्ट रीतीने कसे संस्कारित करता येईल आणि सत्यतत्त्वाचे आकलन होण्यासाठी त्याला कसे सहाय्य करता येईल हाच विचार यात ठळकपणे मांडला आहे.

www.madhaveeradhulveer.com

हितमिममुपदेशमाद्रियन्तां
विहितनिरस्तसमस्तचित्तदोषाः।
भवसुखविरताः प्रशान्तचित्ताः
श्रुतिरसिका यतयो मुमुक्षवो ये॥
॥५८०॥

विहित पद्धतीने ज्यांचे समस्त चित्तदोष नाहीसे झाले आहेत. जे संसारसुखाविषयी उदासीन आहेत. जे प्रशांतचित्त आहेत. जे श्रुतिंचे जाणकार आहेत, ते मुमुक्षु यती या हितकर उपदेशाचा आदर करोत.

विहित पध्दतीने चित्तदोष नाहीसे झालेली व्यक्ती ग्रंथवाचनासाठी आचार्यांना पात्र वाटते. कारण चित्त शुध्द होण्यासाठी यथासांग कर्मे निरासक्त वृत्तीने करावी लागतात. अशी कर्मे करून ज्याचे मन शुध्द झाले आहे तो आपोआपच इहपरलोकातील भोगांविषयी विरक्त होऊन जातो. आणि ज्याला वेदांचे ज्ञान आहे त्या मुक्तीची इच्छा करणाऱ्याने, संयतेंद्रियाने हा ग्रंथ वाचावा. या उपदेशाचा आदर करावा.

इथे आचार्य श्रुतिरसिकत्वाचा आग्रह धरतात. तो वेदप्रामाण्यवृत्तीचा द्योतक आहे. या ग्रंथातही आचार्यांनी अनेक वेळा श्रुतिवचने उद्धृत केली आहेत. थोडक्यात हा ग्रंथ देखील (गीते प्रमाणेच) उपनिषदांचे सारच आहे.

यती व मुनि या शब्दातून इंद्रियनिग्रह अपेक्षित आहे.

www.madhaveeraghuveer.com

संसाराध्वनि तापभानुकिरणप्रोद्भूतदाहव्यथा
खिन्नानां जलकाङ्क्षया मरुभुवि भ्रान्त्या परिभ्राम्यताम्
अत्यासन्नसुधाम्बुधिं सुखकरं ब्रह्माद्वयं दर्शयन्ति
एषा शंकरभारती विजयते निर्वाणसंदायिनी ॥ ५८१

हा ग्रंथसमाप्तिचा श्लोक आचार्यांच्या या अद्भुत ग्रंथाचा जयजयकार करणारा आहे. त्याची महती यात स्पष्टपणे वर्णन केली आहे.

संसाररूपी मार्गावर, दुःखरूपी सूर्याच्या किरणांमुळे उद्भवलेल्या दाहव्यथेने खिन्न झालेल्या, पाण्याच्या इच्छेने वाळवंटात भटकणाऱ्यांना, अगदीच जवळ असणारा सुखदायक, अद्वय ब्रह्मस्वरूप अमृताचा सागर दाखवणारी मोक्षदायिनी अशी श्रीशंकराचार्यांची वाणी विजयी आहे.

अप्रत्यक्ष मार्गाने आणि अतिशय सहजतेने या ग्रंथाची फलश्रुति सांगितली आहे. आचार्यांच्या वाणी-वैभवातून प्रकट झालेला हा साहित्यातील व तत्त्वज्ञानातील हा अद्भुत, अलौकिक असा प्रकरण ग्रंथ आहे.

यात काल्पनिक असा गुरुशिष्य संवाद आहे. आचार्यांनी केलेल्या बोधाला यात शंकरभारती असे यथोचित संबोधन आहे आणि ही वाणी- भारती - सरस्वतीची कृपा — मोक्ष प्राप्त करून देणारी आहे.

संसारमार्ग हा आकर्षक वाटतो पण तो भुलवणारा, मोहात टाकणारा भ्रांतिजनक असा आहे. या मार्गावरून वाटचाल करत असताना कधीकधी जीव घाबरतो, घुसमटतो. यातून सुटका व्हावीशी वाटते. परंतु बाहेर पडण्याचा मार्ग सापडत नाही आणि त्यामुळे भूलभुलैय्यात अडकल्याप्रमाणे मनुष्य पुन्हा पुन्हा त्याच चक्रात सापडतो. त्यातून आणखी खोलात जात राहतो. मुक्तीची इच्छा आहे परंतु उपाय सुचत नाही, अशी विचित्र अवस्था होऊन जाते.



www.madhaveeraghuveer.com

अशा गोंधळलेल्या जीवांसाठी आचार्यांचा हा मार्गदर्शक ग्रंथ म्हणजे संजीवनीच आहे. भौतिक सुखांना अंतिम गंतव्य स्थान मानून जे जीव भटकत असतात, त्यांना ती सुखे क्षणभंगुर आहेत. मृगजळाप्रमाणे आहेत असे तळमळीने [illegible] केवळ सांगून आचार्य थांबत नाहीत तर त्यांच्या अगदी जवळ असणारा अमृतत्वाचा सागर दाखवून तिथपर्यंत पोहोचण्याचा मार्गही आचार्य मोठ्या वत्सलतेने दाखवतात. आणि जीवाच्या मुक्तीची आस पूर्ण करतात.

पुनरपि जननं पुनरपि मरणम् हे संसरण जीवाचे सुरू असते ते केवळ अज्ञानामुळे! अशा साधकांना मुक्तीचा सहजमार्ग दाखवणारा हा ग्रंथ आहे.

December 2016

| Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat | Sun |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 |
| 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 | 31 | | | | | | | | |


Angels fly because they take themselves lightly.

www.madhaveeraghuveer.com